MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष तेरावे / अंक १० / ऑक्टोबर २०१२

## संपादकीय

### माहितीची उपलब्धता व तिचे परिणाम

जगातील सर्वच देशांमध्ये प्रसार पावणाऱ्या सामाजिक संपर्क यंत्रणांचा म्हणजेच, सोशल नेटवर्कींगचा विचार केल्यास प्रामुख्याने तरुणांकडून या माध्यमांचा वापर अधिक होत असल्याचे दिसते. काळजीची बाब म्हणजे, या माध्यमांमुळे घडणारे गुन्हे इतक्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत की त्यांच्या अभ्यासाची स्वतंत्र शाखा निर्माण झाली आहे. यामध्ये शाळा महाविद्यालयांमधील तरुण वर्ग गुंतत चालला आहे. माध्यमांमधून मिळणाऱ्या माहितीची विश्वसनीयता, उपयुक्तता, वापरातील तारतम्य न बाळगल्याने अनेक गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होत आहेत. 'छापून येते, ते सर्वच खरे' असे मानण्याकडे समाजाचा कल असतो. त्यामुळे छापील माध्यमांवर विश्वास ठेवण्याची जी प्रवृत्ती होती, तीच आता संगणक आंतरजाल, भ्रमणध्वनी संच यांबाबत आढळत आहे. नवतंत्रज्ञानाचा हा प्रसार, इतक्या झपाट्याने झाला की, या तंत्रज्ञानामुळे विकसित झालेली दृक्‌श्राव्य माध्यमे माणसावर राज्य करू लागली आहेत. जे जे काही (डिजिटल) गणकीय आहे, ते सर्व खरे मानले जात आहे. शहानिशा न करता अशा प्रकारे विश्वास ठेवणे हे चुकीचे आहे. माहितीचे कोणतेही स्रोत वापरताना तारतम्य बाळगणे आणि सारासार विचार करणे यांची गरज आहे. पण प्रत्यक्षात मानसिकता तशी नाही, हे खरे!

आंतरजालमुळे भौगोलिक सीमारेषांची बंधने दूर सारली गेली. 'जगाचे खेडे' होण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली. माणसे जवळ आली. जोडली गेली आणि त्यांच्यातील विचारांच्या देवाणघेवाणीमुळे काही समाजोपयोगी गट निर्माण झाले, हे ही वास्तव आहे. या तंत्रज्ञानाचा माणसाच्या खाजगी व सार्वजनिक जीवन व्यवहारांवर कळत नकळत चांगला वा वाईट परिणाम दिसून येऊ लागला. त्यातूनच नवीन अंकीय संस्कृती (डिजिटल संस्कृती) उदयाला आली. अरब जगातील जुलमी सत्तेविरुद्ध या माध्यमातून लाखो नागरिकांनी एकत्र येण्याची घटना असो किंवा आण्णा हजारे यांना लोकपाल विधेयकाच्या संदर्भात मिळालेला पाठिंबा असो, जगभरातील अशा अनेक घटनांमधून या माध्यमांची शक्ती लक्षात येत आहे. एकीकडे आंतरजाल गुन्हेगारी, आंतरजाल दमदाटी (सायबर बुलींग) अशा समस्या नव्यानेच निर्माण झाल्या व त्यांनी माणसाच्या सारासार विचारांवर गदा आणली हे वास्तव, दुसरीकडे मोठ्या व्याप्तीच्या आंदोलनांमध्ये आढळणारी उपयुक्तता हे वास्तव; या अंकीय संस्कृतीचे वैशिष्ट्य ठरत आहे.

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - संपादकीय)

२१ व्या शतकात माणसांच्या अनेक विषयांतील संशोधनांची गरज ही देखील वाढत आहे. जनुक शास्त्रांमध्ये संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांना असेही लक्षात येत आहे की या सर्वांचा परिणाम जनुकांमध्ये बारीकसा फरक निर्माण होण्यात होत आहे. 'ऑनलाईन' जीवन व्यवहार आणि 'ऑफलाईन' जीवन व्यवहार यांच्यातील सीमारेषा झपाट्याने बदलत चालली आहे. त्याचा परिणाम सामाजिक अस्तित्वावरही घडून येत आहे. जे काही घडत आहे ते सर्व खरे आहे. असे मानून त्यानुसार कृती करण्याची मानसिकता आंतरजालावर उपलब्ध असणाऱ्या माहितीतून वाढत चालली आहे. अंकीय संस्कृती व माणसाचा मेंदू यांमधील परस्पर संबंधांवर अनेक विद्यापीठांमध्ये संशोधन चालू आहे. मेंदू हा शिकण्याच्या प्रक्रियेतील महत्वपूर्ण घटक असतो व नव्या बदलांशी जुळवून घ्यायचे काम तो करतो. शास्त्रीय परिभाषेमध्ये ज्याला प्लॅस्टिसिटी म्हणतात तो लवचीकपणा असणारा हा अवयव आहे. त्यामुळे माणूस घडणाऱ्या बदलांशी मिळते जुळते घेऊ पहातो. समूहावर विश्वास ठेवणे ही माणसांतील प्रवृत्ती उत्क्रांतीच्या काळापासून दिसते. त्यामुळेच माध्यमांवर माणूस सहजपणे विश्वास ठेवू लागला. शिवाय या सामाजिक माध्यमांद्वारे (सोशल मिडिया) हिंसक घटना माणसाच्या पहाण्यात आल्या तर सारासार विचार करण्याची सीमारेषा जाणून घेण्याची मेंदूची क्षमता मागे पडते. त्यामुळे या अंकीय संस्कृतीचा मानवी मनावर त्याच्या वैयक्तिक व सामाजिक जीवन व्यवहारांवर होणारा परिणाम हा अभ्यासाचा गहन विषय ठरतो. समूहाशी संबंधित यंत्रणा आणि एकूण समाज व शासन व्यवस्था या प्रक्रियेपासून अलिप्त राहू शकत नाहीत. या नव्या संस्कृतिक पर्यावरणाशी संबंधित घडणाऱ्या वाईट घटना टाळायच्या असतील तर, आंतरशाखीय अभ्यास व संशोधनांची वाढती गरज लक्षात घ्यावी लागेल.

या दृष्टीने पाहिल्यास, प्रत्येकच पारंपरिक विद्याशाखेत होणाऱ्या बदलांचा व या भासमान वास्तवाचा (व्हर्च्युअल रिॲलिटी) अन्योन्य संबंध शोधण्याचे आव्हान आज माणसापुढे आहे. माहितीच्या रेट्यामुळे माहितीचा अविवेकी वापर करत राहण्यापेक्षा या आव्हानातून निर्माण झालेल्या व होणाऱ्या संधी ओळखायला हव्यात.

- मोहन पाठक

•••

(वरील संपादकीय मा. संपादक डॉ. विजय बेडेकर यांना वाचून दाखवल्यावर त्यांनी त्यांचे विचार व्यक्त केले. त्यांच्याच शब्दांत हे विचार देत आहे.

- कार्यकारी संपादक)

माणसाच्या प्रगतीचा आलेख हा त्यानेच स्वतःच्या उपयोग व विकासासाठी निर्माण केलेल्या यंत्रांनी होत असतो. या विकासाची सुरुवात आपण औद्योगिक क्रांतीपासून करतो; कारण या आधीचा विकास त्यानेच निर्माण केलेल्या कला, साहित्य यावर प्रामुख्याने होता. औद्योगिक क्रांतीनंतर मात्र, मग ते वीजेचे इंजिन असो की आजचा संगणक, भ्रमणध्वनी असो. त्याची उपयुक्तता आपली संवाद क्षमता आणि उपकरणांचा वेग यांच्यातील स्पर्धेतून व्हायला लागली. प्रत्येक उपकरण हे आपली क्षमता, वेग यांच्या नवीन आविष्काराने आपल्या ताब्यात आली. यंत्र छपाई हे असेच एक नवे माध्यम माणसाच्या हाती आले आणि त्याचा सुदपयोग झाला तेवढा दुरुपयोगही झालेला आपण बघतो. आजच्या संगणकापासून सामाजिक संपर्काच्या माध्यमाचेही हेच आहे. ही सर्व यंत्रे किंवा माध्यमे तटस्थ असतात. आपणहून ती कोणताच विचार

(कव्हर ३ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष तेरावे / अंक १० / ऑक्टोबर २०१२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १७ वे/अंक ४ था)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी :** २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी :** २५३४ ११९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | महायोगी श्री अरविंदांची समाजशास्त्रीय विचारधारेवर आधारित लेख | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | ३ |
| ३) | श्री रामचरित मानस | प्रा. सी. श्री. मुजुमदार | ७ |
| ४) | मला उमगलेले गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर | असीम | ११ |
| ५) | दुर्गा उपासना | श्री. शं. बा. मठ | १३ |
| ६) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २१ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | २८ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
  या पत्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# महायोगी श्री अरविंदांच्या समाजशास्त्रीय विचारधारेवर आधारित

लेखांक-३

*योगी श्री अरविंदांच्या संबंधातील लेखमालेतील पुढील लेख - संपादक*

## राष्ट्रीय आत्मा

श्री अरविंदांच्या सामाजिक तत्त्वज्ञानात मानव, मानवाचं सामूहिक जीवन आणि त्या समूहाची आत्मनिष्ठ संकल्पना यांवर मांडलेल्या विचारांना विशेष महत्त्व आहे. श्री अरविंद म्हणतात की, समाजातील प्रत्येक व्यक्ती ही निरनिराळ्या कारणांनी निरनिराळ्या पद्धतींनी समाजातील इतर समधर्मी, समविचारी व्यक्तींशी परस्पर संबंध निर्माण करत असते. याच प्रक्रियेतून कौटुंबिक पातळीपासून आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक अशा विविध पातळ्यांवर निरनिराळ्या सामाजिक संस्था आणि व्यवस्था निर्माण होतात. आणि अशा प्रकारच्या या असंख्य छोट्या मोठ्या गटांच्या एकत्रित रहाण्यातून मानवाच्या सामूहिक जीवनाची एक अत्यंत गुंतागुंतीची अशी रचना निर्माण होते.

यातील कुटुंब हा सर्वात छोटा आणि प्राथमिक गट आहे. अधिकाधिक मोठे असे गट निर्माण करण्यासाठी जी सामाजिक उत्क्रान्ती चालू आहे त्या अवस्थेत सांप्रत राष्ट्र हा सध्यातरी सर्वात मोठा असा गट आहे. उत्क्रान्तीची ही प्रक्रिया चालूच आहे आणि त्यातूनच संपूर्ण मानवजातीचा एक संघटित गट निर्माण होईल असा श्रीअरविंदांना विश्वास आहे.

पश्चिमात्यांची मानवी समाजाविषयीची संकल्पना ही फक्त परस्परसंबंधातून निर्माण होणारी एक निर्जीव रचना अशा स्वरूपाची आहे. एक जिवंत वस्तू म्हणून या घटकांना ते स्थान देत नाहीत. श्रीअरविंद मात्र मानवी समाजाकडे पाहतात ते पुरुषसूक्तातील संकल्पनेप्रमाणे असलेला एक पुरुष म्हणून आणि ज्याप्रमाणे प्रत्येक माणूस हा उत्क्रान्तीच्या मार्गाने देवत्वाकडे वाटचाल करत असतो. त्याचप्रमाणे मानवी समाज किंबहुना संपूर्ण मानवता ही सुद्धा दैवी समाजाच्या दिशेनेच आपली प्रगती साधत आहे आणि म्हणूनच श्री अरविंद म्हणतात की, प्रत्येक राष्ट्राला, समाजाला अथवा कुटुंबालासुद्धा एक शरीर असतं, एक जीवन असतं, एक स्वभाव असतो, एक मन असतं आणि एक आत्मासुद्धा असतो. श्रीअरविंदांच्या या सांगण्यावर आपण सखोल विचार केला तर आपल्या ध्यानात येतं की आपणांस परिचित असणारं प्रत्येक कुटुंब, प्रत्येक समाज, प्रत्येक राष्ट्र हे प्रगती पथाच्या निरनिराळ्या पातळ्यांवर असतं. एखादा समाज लढाऊ असतो, एखादा व्यापारी वृत्तीचा असतो तर एखादा कलाप्रिय असतो एखादं कुटुंबही कलासक्त आणि निर्मितीक्षम आढळते तर एखाद्या कुटुंबात व्यापारी वृत्तीचा प्रभाव जाणवतो आणि हे सर्व घटक निरनिराळ्या मार्गांनी, निरनिराळ्या पद्धतींनी पूर्णत्वाकडे जाण्यासाठी धडपडत असतात.

समाजाच्या प्रगतीचे टप्पे कसे असतात ते आपण पहिल्या दोन लेखांत पाहिलं होतं. आता या समाजालाही मन असतं, आत्मा असतो ते जाणून घेतलं. यानंतर या समाजाचा मूलभूत घटक म्हणजे 'मानव'. त्याच्या प्रगतीकडे, वैशिष्ट्यांकडे एक दृष्टिक्षेप टाकू.

## मानव आणि त्याच्या प्रगतीचे टप्पे

निसर्गामध्ये प्राणीजीवनांत गटवैशिष्ट्याला अनन्य

साधारण महत्त्व होते. त्यामुळे प्रत्येक प्राण्याची वैयक्तिक वाढ होत असताना ती गटवैशिष्ठ्याच्या चौकटीतच होत असते. परंतु मन आणि बुद्धी विकसित झालेल्या मानवाला मात्र स्वतःच्या जीवनाच्या वैयक्तिक कायद्यानुसार स्वतःची प्रगती साधता येते. या प्रगतीची झेप एव्हढी असते की तो मनाच्या पलीकडे जाऊ शकतो आणि त्यांतून हे मन, ही शक्ती आणि हे त्याचे अस्तित्व या सर्वांचा उगम ज्यापासून झाला त्या सर्वश्रेष्ठ चैतन्याचेही ज्ञान होऊ शकते. मात्र ही प्रगती टप्प्याटप्प्याने होते आणि म्हणून ते टप्पे कोणते व कशा पद्धतीने प्रगत होतात त्याकडे एक नजर टाकू.

Infra-Rational Stage - यामध्ये माणूस आपल्या सहज प्रवृत्तींवर आंतरिक प्रेरणांवर, प्राणिक प्रेरणांवर आणि उत्स्फूर्त कल्पनांवर कार्य करत असतो. यामध्येही पुन्हा २ स्तर असतात. पहिला स्तर असतो तो भौतिक मानवाचा भौतिक जीवनाचा.

भौतिक मानवाचं भौतिक मन – या स्तरावरचा माणूस फक्त शारीरिक गरजा, इच्छा, वासना आणि शारीरिक अडचणी यांचाच विचार करतो आणि त्यातच गुरफटलेला असतो.

भौतिक मानवाचं प्राणिक मन – काहीसा वरच्या स्तरावर गेलेला हा माणूस हुकूमत गाजविण्याचा प्रयत्न करतो. गरज असो वा नसो तो सर्व प्रकारची संपत्ती प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. कुटुंबापासून सुरु करुन समाजातील अधिकाधिक मोठ्या घटकांवर, संस्थांवर आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो.

या भौतिक जीवनाचं वैशिष्टयच स्पष्ट करताना श्रीअरविंद म्हणतात, "Self-preservation, Self-repetition & Self-multiplication" भौतिक जीवनाचा मुख्य हेतु हा प्रकृतीचे प्राणिक साध्य सफल करणे हा आहे आणि म्हणून भौतिक मानव हा जन्मापासून मृत्यूपर्यंत आरामात राहून मौज मजा करत सुखाने जीवन व्यतीत करु पाहतो. कुठल्याही स्थितीत तो जगण्याची आकांक्षा कायम राखतो. या जीवनाला अमरत्व हव असतं पण ते शक्य नाही म्हणून कमीतकमी आपल्यासारखाच जीव निर्माण करतानाही आपली कुटुंबपद्धती, समाज व्यवस्था टिकून रहावी हा त्याचा हेतू असतो. व्यक्ती कुटुंब, समाज व राष्ट्र यांची निर्माण झालेली नैसर्गिक शृंखला हा मानव जपत राहतो. मात्र याच प्रयत्नांमुळे तो परंपरावादी, पुराणमतवादी बनतो. भूतकाळात समाजात झालेले क्रान्तिकारी बदल त्याला मान्य असतात. पण वर्तमानांत होऊ पाहणाऱ्या बदलांना मात्र तो विरोध करतो. वर्तमानातील पुरोगामी विचारवंत त्याला स्वप्नाळू अथवा वेडा वाटतो. मात्र भूतकाळांतील विचारवंतांची मात्र तो पूजा करतो.

त्याच्या पारंपरिक कल्पनांना पचतील, रुचतील एवढीच धार्मिकता त्याला देणारे पुजारी, मठाधिपती यांना तो समाजात स्थान देतो. मात्र परमेश्वराचा शोध घेणाऱ्यांनी संन्यासी बनून समाजापासून दूर अरण्यात रहावं अशी अपेक्षा बाळगतो. आता यापुढील टप्पा आहे तो Rational Stage चा

Rational Stage - या स्तरावर मानव आपल्या थोड्याफार प्रगत पावलेल्या बुद्धीच्या सहाय्याने आणि इच्छाशक्तीच्या जोरावर स्वतःचे विचार, भावना आणि कृती यांना पारखू लागतो. योग्य काय आणि अयोग्य काय ते ठरवू पाहतो. शारीरिक वासनांच्या भ्रमातून, बंधनातून तर्कशास्त्रानं स्वतःला मुक्त करु पाहतो. अशा तऱ्हेने भौतिक जीवनाच, भौतिक मनाचं बौद्धिक मनामध्ये संपूर्ण परिवर्तन होतं तेव्हांच मानवाचं मानव म्हणून खरं जीवन सुरु झालं असं म्हणता येईल.

या स्तरावरचा माणूस आपल्या बौद्धिक विचारशक्तीनं अधिकाधिक ज्ञान संपादन करतो. स्वतःची प्रगती साधणं, स्वतःला अधिकाधिक मोठं करणं हे त्याचं ध्येय असतं आणि म्हणून या स्तरावरील त्याच्या मानसिक जीवनांत सौंदर्याभिरुची आणि नैतिकता यांनाही स्थान असतं.

बौद्धिक विचारशक्तीला 'श्रद्धा' हा एकमेव शत्रू असतो आणि त्यामुळेच या स्तरावर वैचारिक बंडखोरीस

हिंसेचे कधीही समर्थन करता येणार नाही.

सुरुवात होते आणि त्या वैचारिक बंडखोरीचा पहिला हल्ला होतो तो धर्मावर, स्वतःची प्रगती साधणं हा मुख्य उद्देश असल्याने याच स्तरावर Individualistic Age निर्माण होतं.

यानंतर पुढची पायरी असते ती Supra Rational Stage श्रीअरविंद म्हणतात, या स्तरावरील अध्यात्मिक जीवनाला आंच असते ती फक्त चिरंतनाची, सर्वश्रेष्ठ चैतन्याची याचा अर्थ ते इतर जीवनापासून अलिप्त असतं असा निश्चित नव्हे. आध्यात्मिक मानवाच्या मनातील परिपूर्ण सौंदर्याचं स्वप्न हे परमेश्वरी प्रेमांत, सौंदर्यात आणि आनंदात साकार होत असतं. ते कशावरही अवलंबून नसतं आणि त्याच परिपूर्ण कार्याचं स्वप्न सर्वशक्तीमान आणि स्वतः मार्गदर्शित केलेल्या कायद्यावर ठरतं आणि जगाच्या तालबद्धतेत ते कार्यान्वित केलं जातं.

अशा तऱ्हेने मानवाच्या वैयक्तिक प्रगतीचे टप्पे कोणते असतात आणि त्या टप्प्यावरील माणूस कसा असतो, कसा वागतो ते जाणून घेतलं.

त्यापूर्वी आपण हेही जाणून घेतलं होतं की ज्याप्रमाणे मानवाला एक शरीर, मन आणि आत्मा असतो त्याचप्रमाणे या समाज घटकांनाही शरीर, मन आणि आत्मा असतो आणि म्हणून हे घटकही मानवाप्रमाणेच टप्प्याटप्प्याने प्रगती साधत असतात.

मानवाने निर्माण केलेल्या विविध समाज संस्थांपैकी राज्यसंस्था हा असा एक घटक आहे की जो मानवी जीवनाच्या प्रगतीस फार मोठा हातभार लावत असतो. आजच्या राज्यसंस्थांनी तर मानवाचे संपूर्ण जीवन व्यापून टाकले आहे. अशा या राज्यसंस्थेला सुद्धा मानवी जीवनाप्रमाणेच वरील ३ टप्पे पार करावे लागतात.

Infra Rational Stage - या पहिल्या पायरीवर राज्यसंस्था या राजेशाही अथवा सरंजामशाहीच्या स्वरुपातच आढळतात. अशा प्रकारच्या राजकीय संस्था परस्परांशी संबंध ठेवत नैसर्गिक प्रगती साधतात. त्यांच्या एकूणच कार्यपद्धतीतून शारीरिक व प्राणिक गरजांना प्राधान्य दिले जाऊन त्या भागवल्या जातात. अशा संस्था केवळ प्रमुखाच्या गुणसामर्थ्यावरच नव्हे तर संपूर्ण समाजाच्या एकोप्यामुळे चिकाटीने टिकून राहू शकतात. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठेशाही कशी टिकून राहिली ते आपण पाहिलेच आहे. मात्र अशा संस्था शेवटी आंतरिक प्रेरणांमुळे अथवा बाह्य दबावामुळे नाहीशा होतात. मराठ्यांचे राज्य शेवटी निरनिराळ्या कारणांमुळे कमकुवत बनले होते आणि त्याचवेळी शिस्तबद्ध असा जो बाह्य शक्तींचा दबाव आला त्याला तोंड देणं त्यांना शक्य झालं नाही.

Rational Stage - समाज अथवा समाजातील एखादा शक्तीशाली गट जेंव्हा या पायरीवर जातो तेव्हां एखाद्या प्रभावशाली अशा क्रान्तीच्या लाटेने नवीन पद्धतीची राज्यसंस्था उदयास येते. ही नवी राज्यसंस्था आणि तिची विचारधारा **स्वातंत्र्य–समता–बंधुत्व** या तीन थोर तत्वांना आपल्या प्रगतीचा आदर्श मानते. जगाच्या सांप्रतच्या इतिहासांत फ्रेन्च राज्यक्रांतीनं या तीन थोर तत्त्वांना मानवतेसमोर आणले. या नवीन राज्यसंस्थेसही वरील आदर्श प्रस्थापित करण्यासाठी तीन टप्प्यांतून जावे लागते.

**पहिला टप्पा** हा व्यक्तिवादी आण कट्टर लोकशाहीवादी असतो व 'स्वातंत्र्य' हे त्याचे मुख्य तत्व असते.

**दुसरा टप्पा** हा समाजवादाकडे झुकणारा, अंतिमतः सरकारी साम्यवादाकडे नेणारा यात 'समता' हे मुख्य तत्त्व असते आणि राज्यशासन हा त्याचा आधार असतो.

**तिसरा टप्पा** 'अनार्किझम्' चा. अर्थात या शब्दाचा जो श्रेष्ठतर असा अर्थ आहे. त्या उच्च दृष्टिकोनातून म्हणजे या टप्प्यावर घटकांमध्ये मुक्त असा ऐच्छिक सहकार असतो. मुक्त अशी सांप्रदायिकता असते पण त्यांत बंधुत्वाची किंवा मैत्रीची भावना असते. राज्यशासनाला फारसं महत्त्व नसतं किंवहुना त्याची फारशी गरज उरत नाही.

अशा तऱ्हेने राज्यसंस्थेच्या प्रभावाखाली मानवी समाज आपली सामूहिक प्रगती कशी साधतो कोणत्या टप्प्यातून त्यास जावे लागते ते आपण पाहिले. यातील पहिल्या दोन टप्प्यांचा अनुभव मानवतेने गेल्या दोनशे वर्षांत

घेतला आहे. त्या दोन टप्प्यांवरील व्यवस्थेचे गुण-दोष कोणते, त्यांतून कोणते नवीन प्रश्न निर्माण झाले, या व्यवस्थाना किती यश मिळालं, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही थोर तत्त्व खऱ्या अर्थानं का प्रस्थापित होऊ शकली नाहीत आणि त्यांच्या प्रस्थापनेसाठी आणि मानवी समाजाच्या खऱ्याखुऱ्या प्रगतीसाठी काय करायला हवं यावर श्रीअरविंदांनी व्यक्त केलेले विचार आपण पुढील लेखात जाणून घेऊ.

आधार : १) महायोगी श्री अरविंदांचे Human Cycle .
२) महायोगी श्री अरविंदांचे Synthesis of Yoga

श्री. नरेन्द्र नाडकर्णी
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी - २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

## १८ व्या शतकातील लंडन

या नावाचे व लंडनचा १८ व्या शतकातील इतिहास परिपूर्णतेने उलगडून दाखवणारे पुस्तक पेरी व्हाईट या लेखकाने लिहिले आहे. बोडले हेड यांनी हे पुस्तक प्रकाशित केलेले असू(६८२ पृ.) त्याचे परीक्षण हिस्टरी टूडेच्या ऑगस्ट २०१२ च्या अंकात आले आहे. या अंकातील सर्वच परीक्षणे इतकी सुंदर आहेत की ती वाचल्यानंतरी मूळ पुस्तक वाचावेसे वाटते. (पृष्ठ ५७ वर हे परीक्षण आहे)

हिस्टरी टुडे हे मासिक लंडनहून प्रसिद्ध होते. याचे संकेत स्थळ www.historytoday.com हे आहे. इच्छुकांनी अवश्य वाचावे असे हे अभ्यासपूर्ण मासिक आहे.

## 'मॅजिक स्क्वेअर'

काही गोष्टींचे योग मोठे विलक्षण असतात. काल कॉम्प्युटर सुरु करुन मेल चेक करत होतो. एवढ्यांत 'दिशा' चा ऑगस्टचा अंक आला. पहिलाच लेख डॉ. आगरकरांचा होता. केंब्रिज युनिव्हर्सिटी, किंग्ज कॉलेज वगैरे परिसरांचं वर्णन वाचत ट्रिनिटी कॉलेज पर्यंत पोहोचलो. श्रीनिवास रामानुजन इथेच शिकले हे वाचून त्यांच्यावर अलीकडे वाचलेल्या एका लेखाचं स्मरण करत होतो. एवढ्यात मेलकडे लक्ष गेले. कोणी तरी एक 'मॅजिक स्क्वेअर' पाठवला होता. तसे हे मॅजिक स्क्वेअर अनेक असतात. पण हा वैशिष्ट्यपूर्ण होता. जवळ जवळ २१ पद्धती एकाच मॅजिक फिगरकडे नेत होत्या? कसा होता तो स्क्वेअर?

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | १२ | १८ | ८७ |
| ८८ | १७ | ९ | २५ |
| १० | २४ | ८९ | १६ |
| १९ | ८६ | २३ | ११ |

या चौकोनाचं आणखी एक वैशिष्ट्य असं होतं की त्याच्या पहिल्या ओळीतील आकडे हा चौकोन बनवणाऱ्या व्यक्तीची जन्म तारीख दर्शवत होते. २२/१२/१८८७ आणि त्या महान व्यक्तीचं नावं श्रीनिवास रामानुजन.

संकलन : नरेन्द्र नाडकर्णी.

# श्री रामचरित मानस

*श्री रामचरित मानस या विषयासंबंधातील हा पुढील लेख – संपादक*

श्री. शंकरजी, नारदमुनी, ध्रुव, श्री. पवनपुत्र हनुमान ह्यांनी नामाचा जप सतत करून श्री रघुनाथजींना आपल्या आधीन करून घेतलं. नीच अजामिळ गज आणि गणिका वेश्या श्री हरीनामाच्या प्रभावाने मुक्त झाल्या. पहिल्या युगात सत्य ध्यानाने दुसऱ्या युगात यज्ञाने, तिसऱ्या युगात व्यापार पूजाअर्चाकरून भगवान प्रसन्न होत असत. पण पापांची जड आणि मलीन अशा कलीयुगात फक्त नामाच्या उच्चारणाने मनुष्य पापमुक्त होऊ शकतो. नाम कसेही घ्या तुमचं कल्याणच होते.

**भायँ कुभायँ अनख आलसहूँ।**
**नाम जपत मंगल दिसि दसहूँ।।**

त्या रामनामाचे स्मरण करूनच रामलीलांचे वर्णन करणार आहे. साधे राजे सुद्धा चांगले कवी, वाईट कवी सर्व नर नारींच्या स्वत:च्या बुद्धीनुसार केलेल्या स्वत:च्या गुणगानाचा सन्मान करतात, श्री रामचंद्र तर विशुद्ध प्रेमाने खुश होतील पण माझ्यासारखा मूर्ख आणि मलीनबुद्धी कोण असणार. पण ज्या रामरायांनी दगडांना जहाज बनविले आणि वानर आणि अस्वलांना आपले मंत्री बनविले ते माझ्या सारख्या चाकराची प्रिती आणि आवड लक्षात घेऊन माझ्या कवितेचे स्वागतच करतील. मी स्वत:ला रामाचा आणि इतर लोकही मला रामाचा सेवक मानतात, पण रामरायांना श्री, सीता नाथजींसारख्या समर्थ स्वामींचा तुलसीदासांसारखा सेवक आहे. ही निंदा सुद्धा सहन करण्यास जड वाटत नाही.

**हाँहु कहावत सबु कहत राम सहत उपहास।**
**साहिब सीतानाथ से सेवक तुलसीदास।।**

अशा तऱ्हेने तुलसीदास रामरायांच्या मोठेपणाची बरीच उदाहरण देत आणि स्वत:च्या गुणदोषांच वर्णन करून श्री. रघुनाथजींचे निर्मळ यश वर्णन करायला सुरुवात करतात जे ऐकून कलियुगातल्या सर्व पापांचा नाश होतो.

जी कथा याज्ञवल्क्य ऋषींनी मुनिश्रेष्ठ भरद्वाज ऋषींना सांगितली ती कथा मी सांगणार आहे असे तुलसीदास म्हणतात. ती ऐकून सज्जन लोकांना अपार सुख मिळेल. हे परमपावन चरित्र श्री. शंकरजींनी रचले आणि आपली पत्नी पार्वतीला ऐकविले तेच चरित्र त्यांनी काकभुण्डिजींना दिले कारण ते योग्य अधिकारी आणि मोठे रामभक्त होते. काकभुण्डिजींना ते याज्ञवल्क्य ऋषींना व त्यांनी ते भरद्वाजऋषींना ऐकविले. ते सर्व हरीभक्त होते त्यामुळे त्यांनी ते सहज समजले. मी म्हणजे तुलसीदासजींने ते चरित्र, कथा त्यांच्या गुरूंकडून वाराह क्षेत्रात ऐकली पण लहान वय असल्यामुळे त्यांना ते चांगल्या तऱ्हेने समजली नाही. त्यांच्या मतांनुसार कथा सांगणारा आणि ऐकणारा श्रोता ज्ञानाचे खजाने होते. पण मी तर महामूर्ख आणि जडजीव असल्यामुळे ती कथा अवघड वाटत होती.

**श्रोता बकता ग्याननिधि कथा राम कौ गुढ।**
**किमि समुझो मै जीव जड कलि मल ग्रसित विमूढ।।**

पण मला माझ्या गुरुंजींनी ती बरेच वेळा ऐकविली तेव्हा माझ्या बुद्धीनुसार जशी कळली तशी मी भाषाबद्ध केली. जशी हरीने मला प्रेरणा दिली त्याप्रमाणे अज्ञान भ्रम हरणारे आणि संसाररूपी नदी पार करणारी नाव असते तशी ती तयार केली. नंतरच्या सर्व चौपायांमध्ये रामकथेचे बरेच गुणवर्णन केले आहे. श्री रामचंद्रांचे चरित्र सुंदर चिंतामणी

आहे. ते मुक्तीधन धर्म आणि परमधाम दायक आहे. संसाररुपी रोगांचे निदान आणि त्याचा नाश करणारे देवतांचे गुरु श्री. अश्विनीकुमार ह्यांच्या सारखे आहेत. दारिद्ररुपी दावानल विझवण्यासाठी व कामना पूर्ण करणारे मेघ आहेत आणि शिवजींचे पूज्य, प्रियतम अतिथी आहेत.

**अतिथी पूज्य पियतम पुरारि के। कामद धन दारिद दवारि के।।**

दारिद्र्य नाहीसे करणारे धनाने भरलेले मेघ आहेत. सर्वांत महत्वाची चौपाई जी मला फार आवडते.

**मंत्र महामनि विषद ब्याल के। मेटत कठिन कुंअक भालके।।**

विषयरूपी सापाचे जहर उतरवणारे महामणि मंत्रासारखे आहेत. त्याचप्रमाणे स्वत:च्या कपाळावर लिहल्या गेलेल्या कठिण आणि वाईट प्ररब्धाचा नायनाट करणारे मंत्र आहेत.

रामनामाला विविध प्रकारच्या उपमा देत नाम नामाची महती दिली गेली आहे. ज्या प्रकारे श्री पार्वतीमाताने श्री शंकरजींना प्रश्न केला व श्री शंकरजींनी विस्तारपूर्वक रामकथा निवेदन केली त्याचे वर्णन रामचरित मानस ग्रंथात देणार आहे, असे तुलसीदास म्हणतात.

राम अनंत आहेत आणि त्यांच्या कथा अनंत आहेत. ज्यांचे विचार निर्मल आहे त्याबद्दल आश्चर्य दाखविणार नाही. ह्याप्रमाणे सर्व संशय दूर करुन आणि गुरुजींची चरण धूळ डोक्यावर घेऊन पुन्हा वंदन करुन, शिवजींना प्रणाम करुन रामकथेला प्रारंभ करत आहे. त्यामुळे ह्या कथेच्या रचनेत कुठल्याच प्रकारचा दोष उद्भवणार नाही. संवत १६३१ ला या कथेचा आरंभ केला आहे. चैत्र महिन्यांतील मंगळवारी अयोध्येत श्री रामरायांचा जन्म महोत्सव होतो तेव्हा सर्वतीर्थे येथे येतात. असूर, नाग, पक्षी, मनुष्य, देवता अयोध्येत येऊन श्री रघुनाथजींचा सेवा करतात. बुद्धीमान लोक जन्ममहोत्सव करतात. रामरायांचे गुणगान गातात. शरयू नदीत स्नान करुन रामनामाचा जप करतात. त्या अयोध्येचे गुणगान केले आहे. ह्या ग्रंथाचे नाव रामचरित मानस आहे. कारण हे वाचताच मनाला शांतता मिळते. हे रचून आपल्या मनात ठेवले आणि योग्य वेळ बघून मगच पार्वतीला ऐकवलं. तीच सुंदर कथा तुम्हाला सांगतो. तेव्हा सर्व सज्जन लोक ही कथा मन लावून आणि आदरपूर्वक ऐका. ह्या रामचरितमानसाचा उगम कसा झाला ज्या हेतून तो जगात प्रसिद्ध झाला ते सर्व श्री उमा महेश्वरांचे स्मरण करुन तुम्हाला सांगणार आहे.

नंतरच्या सर्व चौपाई दोह्यांत रामचरित मानस ह्या सरोवराची वेगवेगळी रूपे दाखविली गेली आहेत. ह्या सरोवरांतील निर्मल जल हे सगुण रूप अवताराच्या लीला आहेत हे निर्मल जल भक्तांचे जीवन आहे. ह्या कथेत जे विचारपूर्वक रचलेले दोहे, छंद, सोरठे हे एक अनेक रंगाचे कमळाचे समूह आहेत आणि चार जणांचे उत्तम भुपुडी संवाद (गरुड, शिव-पार्वती, याज्ञवल्क भारद्वाज आणि तुलसीदास-संत) हे ह्या सरोवराचे चार घाट आहेत.

सात कांड हे ह्या मानससरोवराच्या सात पायऱ्या आहेत ज्यांना ज्ञानरुपी नेत्रांनी बघताच मन प्रसन्न होतं. ह्याच प्रमाणे इतर सुंदर सुंदर उपमा देत ह्या सरोवराचे उत्तम वर्णन केले गेले आहे. जे लोक हे वाचतात ते अथवा ऐकतात ह्या सरोवराचे रक्षक आहेत. अतिशय दुष्ट, कामी, विषयी लोक ह्या सरोवराजवळ येऊ शकत नाही. आपल्या संसारातील वेगवेगळ्या समस्या, चिंता, वाईट लोकांची संगत हे वेगवेगळे पहाड आणि अवघड वाटा आहेत. त्यांतून मार्ग काढत येथे पोहचणे अवघड आहे. जे लोक श्रद्धारहीत आहे. जे संताना साथ देत नाहीत. ज्यांना श्री. रामजी बद्दल स्नेह नाही त्यांना हे मानस सरोवर अत्यंत दुर्गम आहे. अशा उत्तम मानस सरोवराबद्दल त्यांनी वेगवेगळ्या प्रसंगाबद्दल उत्तम उपमा दिल्या गेल्या आहेत. तुलसीदास

सांगतात की अशा राम सुयशरुपी जलाने ज्यांनी आपले हृदय स्वच्छ केले नाहीत ते दुर्दैवी जीव आहेत. मृग जळामागे धावणाऱ्या हरीणासारखे त्यांना दु:खाशिवाय काहीच मिळणार नाही म्हणून आयुष्यात एकदा तरी ह्या मानस सरोवरांत डुबकी मारणं हेच जीवनाचं सार्थक करुन घेण्याचा उपाय आहे.

नंतरच्या दोह्यांत परत शंकर भवानींना वंदन करुन आणि रघुनाथजींना प्रमाण करुन दोन श्रेष्ठ मुनि (भारद्वाज-याज्ञवल्क्य) ह्यांच्या भेटीचे आणि संवादाचे वर्णन करतात. ह्या दोह्यापासून रामायणाच्या खऱ्या कथेला सुरुवात होत आहे.

भारद्वाज मुनी प्रयागात राहतात रामचरणावर त्यांचे फार प्रेम आहे. ते तपस्वी, जितेंद्रिय दयेचे निधान आणि परमार्थांत फार चतुर आहेत. माघ महिन्यात जेव्हा सूर्य मकर राशीत येतो तेव्हा सर्व लोक तीर्थराज प्रयागांत येतात. त्रिवेणीत स्नान करतात श्रीवेणीमाधवांच्या चरणकमलांचे पूजन करतात. अक्षय वटाला स्पर्श करतात, परस्पर भगवान रामरायांच्या गुणांचे वर्णन, गायन करतात आणि समाधानाने परत आपआपल्या आश्रमांत निघून जातात. भारद्वाज ऋषींचा खूप आनंद देणारा हा आश्रम सगळ्यांनाच फार आवडतो. दरवर्षी हा सोहळा असाच चालत असतो.

एकदा मात्र ह्या सोहळ्यांतून परत जातांना भारद्वाज ऋषींनी परम ज्ञानी याज्ञवल्क ऋषींचे चरण धरुन त्यांना आपल्या आश्रमांत ठेवून घेतलं. त्यांचे पाय धुतले आपल्या आसनावर बसवलं. त्यांची पूजा केली त्यांच्या यशाचं वर्णन केल आणि अत्यंत पवित्र वाणीने त्यांना विचारणा केली.

हे ऋषीवर माझ्या मनांत एक फार मोठा संदेह आहे, जो आपण दूर करु शकता. पण विचारण्यास मला भय आणि लाज वाटत आहे. भय ह्या करिता की मी आपली परीक्षा घेत तर नाही ना असे आपणांस वाटू नये आणि लाज ह्याकरित की इतके आयुष्य घालवून सुद्धा इतका संदेह कसा काय, म्हणजे अजून ज्ञान आलेच नाही. पण न विचारणं सुद्धा बरोबर नाहीच कारण मी अजून सुद्धा अज्ञानीच राहीन. दुसरं अस की संत अस म्हणतात की गुरुपासून एखादी गोष्ट लपवून ठेवली तर ज्ञान होतच नाही. म्हणून मला जो मोह झालेला आहे अथवा संदेह निर्माण झाला आहे तो आपणांस विचारत आहे. त्याच कृपाकरुन निवारण करा.

संत, पुराण उपनिषद इत्यादींनी राम नामाचा अपार महिमा गायला आहे. कल्याण स्वरूप ज्ञान गुणांचे भांडार अविनाशी भगवानशिव रामनामाचे अविरत स्मरण करतात. ते राम कोण आहेत हे मला सांगा. एक राम अवध नरेश दशरथ महाराजाचे पुत्र ज्यांचे चरित्र सर्वांनाच ठाऊक आहे. त्यांनी स्वत:च्या पत्नीच्या विरहांत अपार दु:ख सहन केलं आणि क्रोध आल्यानंतर रावणाचा वध करून स्वत:च्या पत्नीची मुक्तता केली.

विरह वा क्रोध येणारे राम आणि शंकर भगवान ज्यांचे निरंतर ध्यान करणारे राम हे दोन वेगळे आहेत का? आपण सत्याचे धाम आहात, तेव्हा नीट विचार करून मला माझ्या संदेहाचं निवारण करा ज्यामुळे मला झालेला हा भ्रम नाहीसा होईल त्याकरिता मला सर्व कथा विस्तारपूर्वक सांगा.

यावर याज्ञवल्क्यमुनी हसून सांगतात, हे मुनिश्रेष्ठ भारद्वाज महाराज आपण रामरायांच्या प्रभावाला पूर्णपणे जाणून आहांत. तुम्ही मन, वचन आणि कर्माने श्री रामजींचे भक्त आहांत. तुमचे चातुर्य मी समजलो.

रामरायांच्या रहस्यमय गुणाचं वर्णन तुम्हांला माझ्याकडून ऐकायच आहे म्हणून तुम्ही अगदी मूढ आहांत अश्या थाटांत मला हा प्रश्न विचारत आहात. तेव्हा हे मुनिश्रेष्ठ अज्ञान हा विशाल महिषासुर आहे आणि त्याला नष्ट करणारी कालिका ही राम कथा आहे. राम कथा चंद्रमाच्या किरणांसारखी आहे ज्याच पान संतरूपी चकोर निरंतर करत असतात. अशाच प्रकारचा प्रश्न पार्वतीजींनी

बाह्य शुचिता खूप सोपी आहे; पण अंत:शुचिता कठीण.

श्री महादेवांना केला तेव्हा त्यांना जे सविस्तर उत्तर दिल तीच कथा मी तुम्हाला सविस्तर सांगतो.

एकदा त्रेता युगांत शिवजी अगस्तऋषींकडे गेले. त्यांच्या बरोबर जगज्जननी सती ह्याही होत्या. ऋषींनी त्यांचे पूजन केल. अगस्तऋषींनी रामवतारी कथा विस्तारपूर्वक वर्णन केली. ती ऐकून महेश्वरांना फार समाधान वाटलं. नंतर ऋषींनी शंकराजींना सुंदर हरीभक्तीची विचारणा केली त्यांना खरोखरच उत्तम अधिकारी जाणून रहस्यसहित भक्तीचे निरुपण केलं. शिवजी काही दिवस येथे राहिले आणि नंतर ऋषींची परवानगी मागून परत कैलास पर्वतावर येण्यास निघाले. अर्थात त्यावेळी सती त्यांच्या बरोबरच होत्या. त्याचवेळी पृथ्वीचा भार हरण्याकरिता भगवंताने रामाचा अवतार घेतला होता. त्यावेळी पित्याच्या आज्ञेचे पालन करण्याकरिता दंडक वनांत फिरत होते.

भगवान शिवजी विचार करू लागले की मला भगंवताचे दर्शन कस होईल. कारण भगवंताने गुप्तरूपाने राम अवतार घेतला आहे. माझ्या जाण्याने सर्व लोक त्यांना ओळखून घेतील. ह्यामुळे शंकरभगवानांच्या मनात फार दुविधा निर्माण झाली. पण सतीजींची कल्पनाच नव्हती. शिवजींच्या मनांत भगवान दर्शनाचा लोभ तर होतच होता. पण त्यांचे रहस्य उलगडून जाईल म्हणून भीती वाटत होती.

रावणाने ब्रम्हाजींकडून मनुष्याच्या हातून मरण मागितलं होत आणि ब्रम्हाचे खरं करण्याकरीता भगवंताने मानव रूपात अवतार घेतला होता. पण हे रहस्य कोणालाच ठाऊक नव्हते. त्याचवेळी रावणानं मारीचाचा कपटमृग बनवून कपट करुन सीतामाईचं हरण केल. त्याला सुद्धा श्रीरामजींचा प्रभाव ठाऊक नव्हता.

कपटी मृगाला मारुन बंधु लक्ष्मणासह राम (हरी) आश्रमांत आले आणि सीतामातेला तेथे न बघताच त्यांच्या डोळ्यात अश्रू आले. आपल्या पत्नीचा विरह त्यांना सहन होईना. सर्व साधारण मानवासारखे पत्नीच्या विरहाने व्याकूळ होऊन सीताजींच्या शोधांत ते फिरू लागले. ज्यांना कधी संयोग वियोग ही भावनाच नव्हती त्यांना सुद्धा विरहाचं दुःख होतांना दिसत होते.

अशी भगवंताची अलौकिक लीला पूर्ण ज्ञानी लोकच जाणू शकतात. जे अज्ञानी आहेत ते मोहामुळे वेगळाच विचार करतात.

**प्राचार्य सी. श्री. मुजुमदार**
१०४, फ्लॅट सी-२, इमारत क्रं-३,
सी. एन.सी. रॉयल पार्क,
कांजुरमार्ग, मुंबई - ४०००४२.
भ्रमणध्वनी : ९७६९३१०७४६

●●●

## जुन्या म्हणी

- जामीन राहा आणि गाठचे वाहा.
- जावई पाहुणा आला म्हणून रेडा का दूध देणार आहे?
- जावे रगीने की जावे वगीने.
- जाळावीण कढ नाही, मायेवीण रड नाही.
- ज्याचा खावा ठोबारा, त्याचा राखावा उंबरा.
- ज्याची त्याला झोप नाही शेजारणीला झोप नाही.
- त्याची नीती खोटी, त्याच्याच तोंडी तूपरोटी.
- ज्याचे असेल मढे त्याला येईल रडे.
- ज्याचे मनी कपट त्याचे होते तळपट.
- ज्याचे हाती ससा, तो पारधी.
- ज्याच्या कपाळी बाशिंग तो नवरा.
- ज्याला नाही अक्कल, त्याची घरोघर नक्कल.
- जिवावर उदार तो लाखाशी झुंझार.
- जेवायला गेला आणि तोंड विसरुन आला.
- जो भिऊन वागे त्याचे मागे देव लागे.
- जोवरी न देखिले पंचानना तोवरी जंबूक करी गर्जना.

# मला उमगलेले गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर

*गुरुदेव रविन्द्रनाथ टागोरांच्या प्रार्थनांची ही भाषांतरे मूळ कवितेतील नजाकत भाषांतर शैलीतून कशी उतरली आहे ते आवर्जून पाहण्यासारखे आहे. - संपादक*

*1*

*Thou hast made me endless, such is thy pleasure,*
*This frail vessel thou emptiest again and again,*
*and fillest it ever with fresh life.*
*This little flute of a reed thou hast carried over hills and dales,*
*and hast breathed through it melodies eternally new.*
*At the immortal touch of thy hands my little heart loses its limits in joy*
*and gives birth to utterance ineffable.*
*Thy infinite gifts come to me only*
*on these very small hands of mone. Ages pass,*
*and still thou pourest, and still there is room to fill.*

*- Gurudev Ravindranath Tagor*

*केलेस तुचि अनंत मला तव असीम औदार्याने*
*हा नाजूक प्याला करीशी रीता भरण्या काठोकाठ पुनः पुनः*

*हा इवलासा पावा कळकाचा ओठी घेवूनी फिरलास*
*दऱ्या खोऱ्यांतुनी गात गीते नीत नवी फुंकुन प्राण त्यातुनी*

*तंव हाताच्या अमर स्पर्शाने सानुले काळीज माझे होते प्रमुदित*
*अन् प्रसवते कणखर परी मृदुमुलायम शब्द कळेच्या गीतांना*

*तंव अनंत परी असीम प्रदाने सतत पडतो या सानुल्या हातांवर*
*युगा मागुनी युगे तू भरतच राहतोस प्याला तरीही नच भरे पुरेपुर.*

*- असीम*

2

*When thou commandest me to sing it seems that*
*my heart would break with pride; and I look to thy face,*
*and tears come to my eayes.*
*All that is harsh and dissonant in my life melts*
*into one sweet harmony & and my adoration*
*spread wings like a glad bird on its flight across the sea.*
*I know thou takest pleasure in my singing.*
*I know that only as a singer I come before thy presence.*
*I touch by the edge of the far spreading wing of my*
*song thy feet which I could never aspire to reach.*
*Drunk with the joy of singing I forget myself*
*and call thee friend who art my lord.*
*- Gurudev Ravindranath Tagor*

बहातोस जंव तूं मला गाण्यास गीत
वाटते की नाही ना भंगणार काळीज माझे
गर्वानि, अन् न्याहाळीतो मी तुझे मुख
आसवांनी भरलेल्या माझ्या दोन डोळ्यांनी
कर्णकटू अन बेसुरे जेजे मम जीवनी
बदलते तंव गोडच गोड सुसंवादात
अन् माझी मनस्वी दाद पसरते पंख
एखाद्या सागरावरी झेप घेणाऱ्या खगापरी
ठाऊके पुरते मला की आस्वाद तू घेशी
माझ्या या अशा गीतातूनी अन ठाऊके हे ही
पुरते की आहे उभा गात माझे बडबड गीत
केवळ एका अति सामान्य अजाण गायकापरी
होतो मी अती लीन धरण्या तुझे चरण
माझ्या पंखकडांनी, येथवरी मी नसतोच आलो
कुठल्याही अन्य मार्गे अन् कैफात गाण्याच्या
म्हणतो तुला माझा 'सखा' जरी तूं असशी माझा धनी
- असीम

# दुर्गा उपासना

*नवरात्राचे औचित्य साधून श्रीदुर्गा उपासने संबंधातील लेख देत आहोत. - संपादक*

दुर्गा शब्दाचा अर्थ दुर्गा - दुर्गति नाशिनी दु-दारिद्र्य, दुःख, दुर्भिक्ष, दुर्व्यसन इ. रेफ-रोगघ्न-रोग नाहीसे करणारे ग-पापघ्न-अन्याय, अत्याचार, अधर्म अनेकता आलस्य इत्यादी.

प्राचीन काळापासून दुर्गेची उपासना चालू आहे. महाभारत काळी श्रीकृष्णाने विजय प्राप्ती साठी पांडवाना दुर्गा पुजा करणेची प्रेरणा दिली होती. भागवत पुराणानुसार गोपीनी कात्यायनीची आराधना केली होती. यादव लोकांनी दुर्गेची साधना केली. रुक्मिणीने अंबेची उपासना केली.

दुर्गा - देवतां समूहाचे प्रतीक आहे. मार्कंडेय पुराणात या विषयी विस्तृत माहिती आहे. विष्णु ब्रह्म शिव यांच्या एकत्रित तेजाने तसेच अन्य देवतांचे तेज एकवटून दुर्गा ही अवतरली. तिच्या अवतरणाचा उद्देश समाज विस्कळित करणाऱ्या आसुरी संपत्तीचा नायनाट करण्यासाठी होता. तिने अत्याचार अन्याय, अनाचार इत्यादि आसुरी शक्तींचा नाश केला. दुर्गा सप्तशतीत दुर्गेची १०८ नावे दिलेली आहेत. तसेच अन्यत्रही तिची नामावली आहे. मार्कंडेय पुराणात ही दुर्गेची अनेक नांवे आढळतात. शिवदूती, नारायणि, माहेश्वरी, कौमारी, कात्यायनी, भद्रकाळी, चंडी इत्यादि. अन्यत्र आणखी काही विशेष नांवे आढळतात. शाकंभरी, भीमा, भ्रामरी, अर्जुनाने दुर्गापूजा करताना तिला काली, उमा, कपाली, कपिला, कौशिकी इत्यादि नावाने संबोधले. शिवाय भवानी, विंध्यवासिनी अपर्णा, पार्वती ही नांवे प्रचलित आहेत.

देवीचे युद्ध कालीन रूपाचे नांव दुर्गा आहे.

तया विसृज्यते विश्वं जगत् एतत् चराचरं। सैषा प्रसन्ना वरदा् णां भवति मुक्तये।

सप्तशती उपाख्यान हे मार्कंडेय पुराणातील एक प्रसिद्ध प्रकरण आहे. नवरात्रीच्या वेळी लाखो उपासक हा देवीचा पाठ पठण करतात.

आपण सगुण रूपात देवीची उपासना, आराधना, पूजा इत्यादि करतो देवी ही शक्तीचे प्रतीक आहे अष्टभुजा देवी - म्हणजे आठ हात असलेली देवी त्या हातांचे वैशिष्ट्य असे आहे.

१- स्वास्थ्य - प्रगति करण्यासाठी याची आवश्यकता आहे स्वास्थ्य म्हणजे शांत जीवन हा देवीचा एक हात.

२- विद्या - विद्येत शिक्षण अभिप्रेत आहे. भौतिक शिक्षण जीवनोपयोगी आत्मिक शिक्षण आत्मोन्नतीसाठी हा देवीचा दुसरा हात.

३ - धन - संसार चालवण्यासाठी धनाची नितांत आवश्यकता. परिश्रम व इमाने इतबारे धन प्राप्ती करणे आवश्यक. बेइमानी धन संग्रह हा सामाजिक गुन्हा इथे मानवाची सारी सद्बुद्धी नष्ट झालेली असते.

४ - व्यवस्था - या साठी काही गुणांची आवश्यकता - १) इतरावर छाप पडेल असे आचरण २) उपयुक्त जनाशी सदैव संपर्क ३) सर्वच कार्यांची चोख योजना ४)

चांगले वाईट यांचा निर्णय करता न येणे म्हणजे कुबुद्धी.

मार्गातील अडचणी दूर करणे ही व्यवस्था शक्ती आहे. हा देवीचा चौथा हात.

५ - संघटन - संघेशक्तिः। हे सूत्र महत्वाचे, धार्मिक, सामाजिक, राष्ट्रीय संघटणा आवश्यक

६ - यश - त्याग, सेवा, परमार्थ, निःस्वार्थता यानी समाज कल्याण साधण्याची योजना हे यशाचे गमक.

७ - शौर्य - साहस, निर्भिकता, डरपोक, निर्बल असणे अयोग्य साहसाशिवाय सफलता नाही साहसे श्रीः प्रतिवसति हा देवीचा ७ वा हात.

८ - सत्य - सत्यच ईश्वर, सत्य जवळ करणे म्हणजे ईश्वराला जवळ करणे होय. सत्यापासून विचलित होणे म्हणजे ईश्वराशी दुरावा. सत्य ही शक्ती आहे. हा देवीचा आठवा हात.

आम्ही या साऱ्या शक्ती विकसित करणे हा पुरुषार्थ. म्हणजेच देवीच्या आठ भुजा होत.

सफलता प्राप्त झाल्यास देवी प्रसन्न होऊन आशीर्वाद देते.

देवीच्या संदर्भातील काही शब्दांचे आध्यात्मिक स्पष्टिकरण या प्रमाणे- जगत् सर्व कार्य परमकारणात लीन होणे याला जग म्हणावे. जायते गच्छति इति जगत्।

जगत् - सर्व कार्य परम कारणात लीन होणे याला जग म्हणावे जायते गच्छति इतिजगत्।

विष्णु - व्यापक चैतन्य शेष - महा विनाशातही जे बाकी राहते ते शेष. बीजभूत कर्म व ज्ञान रूपी संस्कार. या शेषांवर विष्णु पहुडला आहे. तो शांत असल्याने ती त्याची निद्रा होय.

कर्णमल - त्रिगुणात्मक अविद्या. अहंकाराने झालेली इच्छा मधु कैटभ . ब्रह्माला संसारोन्मुख करण्यासाठी त्यावर हल्ला - मधु कैटभ असुर संघर्ष. ब्रह्मा चिन्मयी महामायेला हाक मारतो. ही महामाया विष्णूची निद्रा - शांतवृत्ती - भंग करते. जागा झालेला विष्णु अहंकारी मधु कैटभाचा नाश करतो मनाला मोकळे करतो. प्रपंचाकडे न वळता आध्यात्मिक जीवन जगण्याला ब्रह्मा समर्थ -

मधुकैटभ - राग व द्वेष यांचे प्रतीक. निद्रिस्त विष्णूच्या कानातील हा मळ. हे जीवाचे शुभाशुभ कर्म होय. ब्रह्मा मनाचे प्रतीक. राग द्वेष मनाला दूषित करतात. मन देवीला शरण जाते ती विष्णूला जागे करते व संघर्ष करून राग द्वेषाचा नाश करते देवी - बुद्धीच्या रूपात आहे.

बुद्धीतील विवेक जागा होऊन आसुरी शक्तीचा नायनाट करणे प्रत्येकाच्या जीवनात हे मधु कैटभ असुर त्रास देताना आढळतात. या कथेच्या द्वारे हे ध्यानात येते की यांचा नाश केला पाहिजे यासाठी दुर्गा - म्हणजे. बुद्धीचे साहाय आवश्यक आहे.

शुंभ - अहंकार निशुंभ - अभिमान, सांसारिक वैभव व सन्मान ही अहंकार उत्पत्ति या अहंकारामुळे बुद्धी झाकाळून जाते व वास्तविकते पासून विचलित होते. याच अहंकारामुळे ममत्वांचा जन्म होतो. सद्बुद्धी त्याचा नाश करते.

चण्ड- व मुण्ड - काम व क्रोध हेच महान शत्रू. आत्मपरायण बुद्धी म्हणजे तीव्र तरवार. या तीक्ष्ण तरवारीने यांचा नाश करते.

रक्तबीज - विषय लोलुपता. विषयाच्या सेवनाने आसक्ती वाढत जाते. हा गंभीर राक्षस आहे. विषयातील आसक्ती काढून टाकून भोग स्वीकारणे. म्हणजे विषयाचा अमल चालत नाही व उपभोगही घेता येतो.

राग द्वेष वियुक्तैस्तु विषयान् इंद्रियैश्चरन्।
आत्मवश्यैः विधेयात्मा प्रसादं अधिगच्छति।

एखाद्यावेळी आलेल्या अनुभवानेही पुढचा निर्णय घेता आला पाहिजे.

असा याचा नाश करते.

दुर्गा कथा ऐकून आध्यात्माचा बोध होतो. पापी लोकांच्या पापी वर्तनाची घृणा करावी मात्र व्यक्तिची करू नये. आपल्या ऋषि मुनींनी ही अलंकारिक श्रेष्ठ कलाकृती निर्माण केली आहे. त्याचा शांत पणे विचार व्हावा.

शक्तीची पूजा निराकार रूपात केली जात नाही. कारण शक्तीचे कार्यच मुळी उत्पत्ति, स्थिती व प्रलय या स्वरुपाचे आहे. या तीन शक्तीस अनुक्रमे लक्ष्मी, सरस्वती, व काली असे म्हणतात. या तीन भिन्न देवता नाहीत. एकाच निराकार देवतेची ही तीन रुपे आहेत. याना अनुरुप, ब्रह्मा, विष्णु, महेश हे तीन वेगळे देव नाहीत निराकार परमात्म्याची ही तीन व्यक्त रुपे आहेत.

नवरात्री उत्सवात या तीनही शक्तींची पूजा केली जाते. महासरस्वती, महालक्ष्मी, महाकाली या तंत्रोक्त तीन शक्ती मानल्या गेल्या आहेत. प्रकृति लोहित शुक्ल कृष्ण वर्णा आहे. श्वेत वर्ण - महासरस्वती, रक्त वर्ण महालक्ष्मी, कृष्ण वर्ण महाकाली. महासरस्वती सत्व गुण प्रधान महालक्ष्मी रजोगुण प्रधान, महाकाली तमोगुण प्रधान आहे.

महासरस्वती काळ आहे. महाकाली प्रलय काळ व महालक्ष्मी सृष्टीकाळ आहे. यांची आध्यात्मिक नांवे ज्ञानशक्ती, इच्छा शक्ती, क्रियाशक्ती, सांख्य योगानुसार सत्व, तम, रज.

ज्ञानेच्छा क्रियायां तिसृणां व्यष्टीनां महासरस्वती, महाकाली, महालक्ष्मी: प्रवृत्ति निमित्त वैलक्षण्येन नाम रुपान्तराणि सच्चिदानंदात्मक परब्रह्म धर्मत्वात् एव शक्तेः अपि त्रिरुपत्वम्। महासरस्वती चिते महालक्ष्मी सदात्मके महाकाली आनंदरूपे। महालक्ष्मी विष्णुत्वं, महाकाली रुद्रत्वं, महासरस्वती ब्रह्मत्वं ''स्थूल देह भवेत् ब्रह्मा, लिंग देहो हरिःस्मृतः ।रुद्रस्तु कारणे देहः तुरीयस्तु अहमेव हि। तांत्रिक मते क्लीं ऱ्हीं ऐं - चित्त आनंद सत् ही वेदान्त नामे.

**महालक्ष्मी सत् रूप, महासरस्वती चित् रुप महाकाली आनंदरुपिणी-**

गार्हपत्य अग्नि रजो रूप, ऋग्वेद, दक्षिणाग्नि सत्वगुण यजु सदाशिवरुपा आह्वनीय - तमोगुण सामवेद, महादेव देवता, प्रथम - अ-कार रज ऋग्वेद, प्रातः सवन, महेश्वर देवता, क्रिया शक्ती दक्षिणाग्नि - 'उ' कार, सत्वरूप, यजु अंतरिक्ष इच्छाशक्ती, माध्यंदित सवन, आह्वनीय - 'म' कार तम रू प द्युलोक ज्ञानशक्ती सामवेद - तृतीय सवन.

**सरस्वती -**

ही भौतिक बुद्धी, संवेदना, ज्ञानयुक्त म्हणून सरस्वतीचे पूजन. आधि भौतिक बुद्धी, विवेक विचार शक्ती, ज्ञान - आत्म प्रकाश या साठी तिची आराधना करणे.

तिचे रूप व ध्वनि - घंटाशूल हलानि शंख मुसले चक्रं धनुः सायकम्

हस्ताब्जैः दधती धनान्त विलसन् शीतांशु तुल्य प्रभाम्।

गौरी देह समुध्दवां त्रिनयनां आधार भूतां महा-

पूर्वामत्र सरस्वती अनुभजे शुंभादि दैत्यर्दिनीम्।

या देवीच्या हातात घंटा, शूल, नांगर, शंख, मुसळ, चक्र, धनुष्यबाण, आहेत ही त्रिनेत्रा, चंद्रमा सारखी प्रभा व मनोहर कान्ति आहे. तीनही लोकाला आधार भूता शुंभ अदि दैत्याना ठार मारणारी ही देवी आहे. या देवी सरस्वतीला मी वंदन करतो.

**कथा - मार्कंडेय पुराणांतर्गत**

प्राचीन काळी शुंभ व निशुंभ यानी इंद्राचे आसन डळमळीत केले व सारे अधिकार ताब्यात घेतले. देवतानी अधिकार प्राप्ती साठी देवीची प्रार्थना केली. त्याना पार्वतीने दर्शन दिले. त्याच वेळी शिव पण प्रगटले. देवी सरस्वती

पार्वतीच्या शरीर कोषातून प्रगट झाली तिला कौशिक अशी संज्ञा त्यामुळे दिली. तिचे लावण्य अतिशय सुंदर होते. शुंभ निशुंभ यानी दूता करवी, चंड मुंडा करवी ही कन्या दानव पतीशी विवाहित व्हावी असा निरोप दिला तेव्हा देवीने सांगितले जो रणांगणात माझ्याशी लढून विजयी होईल. त्याच्याशी मी विवाह करीन. शुंभ निशुंभाना राग आला चंड मुंडानी देवीशी युद्ध केले. देवीने चंड मुंडाना ठार केले शुंभ, निशुंभ सैन्यानिशि लढण्यासाठी आले. तिने घंटानाद केला. चोहोबाजूने देवता अनेक शक्ति सह उभ्या ठाकल्या. देवीच्या शरीरातून चंडिका प्रगट झाली. दोनही कडचे सैन्य कापले जाऊ लागले. तेव्हा रक्तबीज मैदानात उतरला. त्याचे वैशिष्ट्य, जितके रक्ताचे थेंब त्याच्या शरीरातून जमीनीवर पडतील त्यातून एक सैनिक प्रगट होत असे. चण्डिकेने कालिकेला सांगितले त्याचे रक्त पिऊन टाक जमीनीवर पडू देऊ नको. अशा प्रकारे रक्तबीज मारला गेला शुंभ निशुंभ ही ठार झाले महा सरस्वतीचे हे उज्वल रूप ज्ञान व विद्येचे आहे. अज्ञान, अविवेक रुपी अंधकार नष्ट करणे हाच कार्याचा उद्देश याचे प्रतिनिधित्व सरस्वती करते.

सरस्वतीचे दहा श्लोकातून असे वर्णन केले आहे.

**या वेदान्तार्थ तत्वैक स्वरूपा परमेश्वरी।**
**नाम रूपा त्मना व्यक्ता सा मां पातु सरस्वती ।।१।।**

**या सांगोपांग वेदेषु चतुष्केन गीयते।**
**अव्दैता ब्रह्मण: शक्ति: सा मां पातु सरस्वती ।।२।।**

**या वर्णपद वाक्यार्था स्वरूपेणैव वर्तते।**
**अनादि निधना ऽ नन्ता सा मां पातु सरस्वती ।।३।।**

**अध्यात्मं अधिदेवता देवानां सम्यगीश्वर।**
**प्रायगास्ते वदन्ती या सा मां पातु सरस्वती ।।४।।**

**अन्तर्यात्म्यात्मना विश्वं त्रैलोक्यं या वियच्छति।**
**रुद्रादित्यादि रुपस्था सा मां पातु सरस्वती ।।५।।**

**या प्रत्यक् दृष्टिभि:जीवै: व्यज्यमानाऽनुभूयते।**
**व्यापिनी ज्ञातिरूपैका सा मां पातु सरस्वती ।।६।।**

**नाम जात्यादिभि: भेदै: अष्टधा या विकल्पिता।**
**निर्विकलपात्मना व्यक्ता सा मां पातुसरस्वती ।।७।।**

**व्यक्ताव्यक्त गिर:सर्वे वेदाद्या व्याहइति मां।**
**सर्व कामदुघा धेनु: सा मां पातु सरस्वती ।।८।।**

**यां लिहिला अखिलं बंधं निर्मथ्या खिलवर्त्मना।**
**योगी याति परं स्थानं सा मां पातु सरस्वती ।।९।।**

**नामरूपात्मकं सर्वं यस्यां आवेश्यतां पुन:।**
**ध्यायन्ति ब्रह्म रूपैका सा मां पातु सरस्वती ।।१०।।**

ऋग्वेदात सरस्वतीचे वर्णन आम्बितमे नदि तमे देवितमे सरस्वती असे केले आहे.

सरस्वती - सृ धातु अर्थ गति, प्रसारण, गतिच प्रकाश गति अवरोध अंधकार नदी सतत वाहात राहाते म्हणून ती स्वच्छ राहाते याचप्रमाणे गति जीवनात स्वच्छता निर्माण करते. गतिमानता पवित्रतेचे द्योतक आहे.

**काही ऋग्वेदातील सरस्वती विषयक मंत्र**

प्रणोदेवी सरस्वती वाजेभि: वाजिनीवती। धीनां अवित्र्यवतु।

ही देवी अन्नदात्री व दानशूर आहे. शरण आलेल्यांचे रक्षण करते हे सरस्वती आमचे पोषण कर.

आनो देवो बृहत: पर्वतादा सरस्वती नजना गन्तुयज्ञम्।
त्वं देवी जुजुषाणा घृताची गं मां नो वाचमुशती शृणोतु।

जगत्कांता ब्रह्मरुपिणी चिद्रुपा सर्व व्यापिती आम्हाला अलभ्य आहे. तिच्या रूपाकडे जाणेही आम्हाला शक्य नाही. माते आम्हावर कृपा कर व प्रगट हो. तू यज्ञाला चालना देणारी आहेस आमची स्तुती ग्रहण कर.

पावकान: सरस्वती वाजे भि: वाजिनीवती। यज्ञं वष्टुधिया वसु।

सरस्वती देवी आमची यज्ञ कामना पूर्ण करो. आम्हाला विपुल धान्य व संपत्ती प्राप्त होवो. तुझ्या कृपेने आम्ही धन प्राप्ती करु शकू.

चोदयित्री सूनृतानां चेतन्ति सुमतीनाम्। यज्ञं दधे सरस्वती।

आम्हाला चांगले बोलावयास प्रवृत्त करतेस. चांगल्या लोकाना चैतन्य प्रदान करतेस...सरस्वतीचे यज्ञ आम्ही करू. ती आमच्याकडून करवून घेईल.

चत्वारि वाक् परिमिता पदानि तानि विदुः ब्राह्मणाः ये मनीषिणः। गुहात्रीणि निहितानि नेङ्गयति तुरीयवाचो मनुष्या वदन्ति।

वाणीचे चार भाग आहेत परा पश्यंति मध्यमा वैखरी पहिले तीन गूढ अवस्थेत म्हणजे अप्रत्यक्ष आहेत फक्त ज्ञानीच या अवस्था जाणू शकतात. सामान्य माणूस चतुर्थ भाग वैखरीचा उपयोग करतात.

यत् वाक् वदन्ति विचेतनानि राष्ट्री देवानां निषसादमन्द्रा।।
चतुश्रवं लर्जा दुदुरे पयोसी क्वस्विदस्याः परमं जगाम।

वाणी विश्व व्यापिनी आहे. व ती सर्व भूत मात्राना व्यापते. जे कार्य अल्प चेतन आहे ती वाणीच होय. ही बोली भाषा आहे. देवतांचे संचालन वाणी करते. माते तुझ्या या परम स्वरुपाला आम्ही कधी बरे जाणू शकू. कधी तुझ्या चार प्रकारच्या वाणीतील अमृतप्राशन करू शकू.

देवीं वाचमजनयन्त देवास्तां विश्वरुपाः पशवो वदन्ति।
सा नो मंद्रेषु मूर्ज दुहाना धेनु र्वाक् अस्मान् उपसुष्टुतैतु।

देव समूह मध्यमावाणी सर्व प्राण्यांच्या अंतःकरणात निर्माण करतात व ती वैखरीत परिणाम होते. ही गोष्ट सरस्वती आम्हाला सांगो. मानव गाईचे दोहन करून कृतार्थ होतो अशाच प्रकारे हे माते तुझे अमृत पान आम्हाला घडव.

उतत्व पश्यन् न ददर्श वाचं उतत्व शृण्वन् न शृणोत्येनाम्।
उतोत्वस्मै तन्वां विसस्रे जाया पत्येव उशती सुवासा।

माते तुझ्या कृपेमुळे आम्ही सारे काही करतो. तुझी कृपा झाल्याने विचार करतो तुझ्या कृपेने असत् सिद्ध करतो मात्र कोणी तुला ओळखत नाही तुला पाहून ही पहात नाही तुझी कृपा होईल त्यालाच तुझे दर्शन घडते.

अम्बितमे नादितमे देवितमे सरस्वति।
अप्रशस्त इव स्मरामि प्रशस्तिं अम्ब न स्कृधि।

मातेमधे श्रेष्ठ नदीत श्रेष्ठ देवतामधे श्रेष्ठ ही महा सरस्वती आहे. आम्ही धनाच्या अभावी असमृद्ध राहिलो आहोत. म्हणून हे माते आम्हाला विपुल धन संपत्ती प्राप्त होवो.

**महालक्ष्मी**

लक्ष्मी म्हणजे केवळ धन धान्य वृद्धी नव्हे. सर्व प्रकारची उन्नती, सन्मान, मोठेपण, आनंद, ऐश्वर्य यानी युक्त लक्ष्मीचे रूप ध्यानात घ्यावे. लक्ष्मीची पूजा म्हणजे शक्ति पूजा. शक्ती हीच सार सर्वस्व आहे. या शक्तीला महालक्ष्मी अशी संज्ञा आहे. देव दानव युद्धात देवांचा पराभव झाला ब्रह्मदेवाच्या मध्यस्थाने देव विष्णु व महेश यांच्याकडे गेले. त्यांच्या शरीरातून एक शक्ती प्रगट झाली व त्या शक्तीने स्त्रीचे रूप धारण केले सर्व देवतानी आपली शस्त्रे व अस्त्रे तिला अर्पित केली व तिला महालक्ष्मी असे नांव दिले.

सिद्धि बुद्धि प्रदे देवि भक्ति मुक्ति प्रदायिनि।
मंत्र मूर्ते सदा देवि महालक्ष्मी नमोस्तुते।
आद्यन्त रहिते देवि आदिशक्ति महेश्वरी।
योगजे योग संभूते महालक्ष्मी नमोस्तुते।

ब्रह्म वैवर्त पुराण प्रकृति याचा अर्थ -

प्रकृष्ट वाचकः प्रश्च कृतिश्च सृष्टिवाचकः।

---

इच्छेचा लगाम हातात नसेल तर मनाचे घोडे उधळायला वेळ लागत नाही.

सृष्टिप्रकृष्टा या प्रकृतिः सा प्रकीर्तिता।

प्र-सत्वं गुण कृ-रजगुण ति तमोगुज सत्वतमरजसां साम्यावस्था प्रकृतिः

सत्वगुण विष्णु, रजोगुण ब्रह्मा, तमोगुण महेश - ज्ञान इच्छा क्रिया शक्ति

**देवी उपासना – मनो वैज्ञानिक दृष्टिकोन :**

या उपासनेचा हेतू स्पष्ट आहे. समाजात स्त्रिया संबंधी आदराची भावना निर्माण व्हावी व त्यांच्या सन्मानासाठी समाज जागरुक व्हावा. इष्ट देवतेला आपण जगाची माता या स्वरुपात पाहातो याच प्रमाणे प्रत्येक स्त्रीकडे मातेच्या स्वरुपात पाहिले जावे. मात्र मनुष्य इंद्रियांच्या आधीन होऊन या गोष्टीला हरताळ फासतो. त्याचा विवेक नष्ट झालेला असतो. तो स्त्रीशी रानटीपणाने वागतो. कारण इंद्रिये भोग प्रकृतीकडे त्याला खेचून नेतात. काम भावना ही नियंत्रित करता येणे शक्य आहे मात्र इच्छा झाली पाहिजे.

इच्छा शक्तीला ऋषींनी देवीचे रूप मानले. मनुष्याचे पतन वा उन्नती, सबळता वा निर्बळता, कल्याण वा अकल्याण, यावर निर्भर आहे. दृढ इच्छा शक्ति मनाचा एक कोट आहे यामुळे बाह्य कोणत्याही विचाराचा प्रभाव पडत नाही. अनेक बिकट प्रसंगी दृढ मनाचा माणूस तरून जातो. हाच माणूस शांती व प्रसन्नता अनभवू शकतो. कार्यक्षमता इच्छा शक्तीच्या दृढतेवर अवलंबून आहे.

देवीचे उग्ररूप – राक्षसी शक्ती परास्त करण्यासाठीच. एरवी ती भक्ताना सौम्य रूपातच दर्शन देते. देवीला बळी द्यावयाचा याचा सांकेतिक अर्थ कुविचारांचा नाश करावयाचा पशूचा बळी हे कुविचार म्हणजे पशुवृत्तीच त्याचा बळी द्यावयाचा काम, क्रोध, मोह, लोभ हे खरे पशू आहेत याना नष्ट करून यांचे यज्ञात हवन करावे.

कामक्रोधौ द्वौ पशू मनसा बलिं अर्पयेत्।

कामक्रोधौ विघ्नकृतौ बलिदत्तं वा जपं चरेत्।

सृजनशाली हा मातेचा एक विशाल गुण धर्म आहे म्हणून स्त्रीला माता या पवित्र नावाने ओळखले जाते. मातृ शक्तीची उपासना या स्वरुपात झाली पाहिजे.

कमळपुष्प – हे भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठ प्रतीक मानले जाते. कमळ चिखलातून जन्म पावते तरी ते निर्मळ व पवित्र राहाते. कमळ पुष्पाकडून आम्हाला अशी प्रेरणा मिळते की संसारात राहूनही त्यात आसक्त न राहता त्या पासून अलिप्त राहावे. कमळ पुष्प प्रकाश प्रिय आहे. नेहमी प्रकाश सन्मुख राहण्याचा ती प्रयत्न करते. सूर्य आहे तोवर ती विकसित असते सूर्यास्ताबरोबर ती पण मिटते. त्या पुष्पाला अंधकार प्रिय नाही. तमसो मा ज्योतिर्गमय। आपण ही अज्ञान, अविवेक अंधारापासून दूर राहिले पाहिजे.

**शक्ति उपासनेचे रहस्य :**

शक्ती प्रत्येक अणु रेणूत विद्यमान आहे. सर्व वस्तूत शक्तीचे साम्राज्य असून त्याच्यातील क्रियाशीलता निर्माण करणारी ही शक्ती आहे. ती सर्व जगाला पोषण करणारी आहे . म्हणून तिला जगाची जननी म्हणतात. तिची उपासना म्हणजे या विशाल रूपाचे अनुभव घेणे होय. रचना कर्तव्य बुद्धीने व्हावयास हवी. आपल्या पत्नी खेरीज अन्य स्त्री जातीला दुर्गेच्या स्वरुपात पाहावयास हवे. अन्यथा देवीचा अपमान केल्या सारखे होईल. तिला बळी देणे म्हणजे आपल्यातील पशुभावाचा बळी देणे होय. नारीजनाविषयी मातृभाव निर्माण होणे आवश्यक. आपल्या ठिकाणी सात्विकता निर्माण करणे हीच शक्तिसंचय करण्यासारखे आहे. काम क्रोध आदि खरे शत्रू आहेत. दुर्गा या शत्रूना नष्ट करणारी आहे. ही खरी शक्ति उपासना.

अचिन्तस्य अप्रमेयस्य निर्गुणस्य गुणात्मनः।

उपासकानां सिध्यर्थ ब्रह्मणोरुप कल्पना।

जगत् माताच प्रकृतिः पुरुषश्च जगत् पिता।

गरीयसी त्रि जगति माता शत गुणै: पितु:।
त्वमेव सर्व जननी मूळ प्रकृती रीश्वरी।
त्वमेवाद्या सृष्टिविधा स्वेच्छया त्रिगुणात्मिका।(ब्र.वैवर्त पुराण)
कार्या में सगुणो त्वं परानुग्रह विग्रहा।
परब्रह्म स्वरुपा च सर्व पूजा निराश्रया।
स्वर्ग स्वरुपा सर्वेशा सर्वाधारा परात्परा।
सर्वबीज स्वरुपाच सर्वपूज्या निराश्रया।
सर्वज्ञा सर्वतोभद्रा सर्व मंगल मंगला - (ब्रह्मवैवर्त)

**उपासनेचा उद्देश :**

देव व देवी यांची आराधना अशा साठी करावयाची असते की त्या त्या देवतातील विशिष्ट गुण अंगी बाणवणे शक्य व्हावे. ही खरी सगुण पूजा. ईश्वराला सनातन कुमारी असे संबोधिले जाते.

त्वं स्त्री त्वं पुमान् असि त्वं कुमार उतवा कुमारी।
तदेव अग्नि: तदादित्य: तत्वायु: तदुचंद्रमा:।
तदेवशुक्रं ततब्रह्म तत् आप: तत् प्रजापति:।

श्वेताश्वतर ईश्वराची कुमारी अवस्थेत उपासन करणे पवित्र मानले गेले आहे. त्या निष्पाप कुमारीच्या जीवनातून आध्यात्मिक गुणांचा विकास करावा, तसेच दुष्ट विकाराना फाटा द्यावा यामुळे स्त्रीजन भोग विषय राहात नाही. तिथे शिर झुकते. स्त्री बद्दल भोग वस्तु कल्पना असणे हा सामाजिक गुन्हा व धार्मिक पाप आहे. हा स्वत:चा विश्वासघात आहे. नारीजनाकडे उदात्त हेतूने पाहाणे एक व्रत आहे. त्यांनी आत्मिक उत्थान जलद होते. कुमारी शक्तिरुपिणी आहे. सिद्धी, तेजस्विता, सात्विकता, पवित्रता, शालीनता, कोमलता याची साक्षात् मूर्ती. तिच्यात आसुरी भाव शोधूनही मिळणार नाही.

द्विवर्षोत्तमारभ्य दशवर्शावधिक्रमति।
पूजयेत् सर्व कार्येषु यथा विधी युक्तमार्गत:।
द्विवर्षा-कुमारिका सिद्धी-त्रिमूर्तीनी चतुर्वर्षा-कल्याणी, पंचवर्षा-रोहिणी षट्वर्षा भवेत् काली।
सप्तवर्षा तु चण्डिका। शांभवी च अष्टवर्षा दुर्गा तु नवमो स्मृता। दश वर्षा सुभद्रा इति नामानि परिकीर्तित:।
तस्मात् च पूजयेत् बालां सर्वजाति समुध्दवां।
जातिभेदो न कर्तव्य: कुमारी पूजयेन् शिवे।

दुर्गापूजेत जाति भेदाला स्थान नाही.

इतर शक्ति देवता वाहन

ब्राह्मी-ब्रह्माणी-हंस वाहन विवेक बुद्धीचे प्रतीक प्रलयभाव याचे प्रतीक.

माहेश्वरी-वाहन वृषभ-बैल वृष म्हणजे धर्म अशी संज्ञा आहे.

वृषो हि भगवान् धर्म: तस्य या कुरुते अलम्।
वृषलं तं विदुर्देवा: तस्मात् धर्म न लोपयेत्।

कौमारी वाहन मयूर-सद्‌गुणांच्या विकासाची प्रेरणा करते.

वैष्णवी-वाहन गरुड, वाराही-काल शक्तीचे नांव वाहन नाही

ऐंद्री-इंद्र देवतेची अधिष्ठात्री शक्ति वाहन ऐरावत. ईद-गति-ऐरावत-क्रियाशीलता. जीवन सर्वोच्च प्राप्ती साठी गतिशीलता आवश्यक.

चण्ड-प्रवृत्ती मुण्ड-निवृत्ती या दोहींना नष्ट करण्याची शक्ती चामुंडा.

शिव: शक्त्या युक्तो यदि भवति शक्त:प्रभवितुं।
न चेदेवं देवी न खलु कुशल: स्पन्दितुमपि।
अतस्त्वां आराध्या हरिहर विरंचीदिभिरपि।
प्रणन्तु स्तोतुं वा कथमकृतन पुण्य: प्रभवति।(सौंदर्य लहरी)

**उपनिषद-**

आत्मविद्या ब्रह्मविद्या यांची रहस्ये उपनिषदानी विशद

केली आहेत. परमात्म प्राप्तीचे रहस्यमय ज्ञान. भारतीय तत्वज्ञानाचा गाभा उपनिषदातून मिळतो. आत्मकल्याण प्राप्तीचे मार्गदर्शन करणारी विद्या.

**देवी भागवत –**

शाक्तांना हे महापुराण वाटते. या पुराणात शक्ती तत्वाबद्दल विस्तृत माहिती आहे. शक्तीची महिमा स्वीकारण्यात आली आहे.

वर्तते सर्व भूतेषु शक्तिः सर्वात्मना नृप।
शववत् शक्तिहीनवस्तु प्राणी भवति सर्वदा।
नूनं सर्वेषु नाना नामधरा स्वयम्।
भवति शक्तिरूपेण करोति च प्रक्रमम्।
गौरी ब्राह्मी तथा रौद्री वाराही वैष्णवी शिवा।
वारुणि चाथ कौबेरी नारसिंहीच वैष्णवी।

मार्कंडेय पुराणात सप्तशति ही प्रसिद्ध आख्यायिका आहे. यात देवींचे विस्ताराने वर्णन आहे. महिषासुर मर्दिनी, मधु कैटभ यांचा नाश करणारी, शुंभ निशुंभ चण्ड मुण्ड,रक्तबीज यांचा वध करणारी याबद्दल माहिती आहे.

**कालिका पुराण –**

शक्तीसंबंधी स्वतंत्रपुराण, विष्णुधर्मोत्तरपुराण- चण्डिका वर्णन आहे.

**ब्रह्म वैवर्त पुराण –**

त्वमेव सर्व जननी मूल प्रकृतिरीश्वरी।
त्वमेवाद्या सृष्टि विधौस्वेच्छया त्रिगुणात्मिका ।
कार्यार्थे सगुणा त्वं च वस्तुतो निर्गुणा स्वयम्।
परब्रह्म स्वरुपा तत्वं सत्या नित्या सनातनी।
तेजः स्वरुप परमा भक्तानुग्रह विग्रह
सर्व स्वरुपा सर्वेशी सर्वधारा परात्परा।
सर्व बीज स्वरुपा च सर्वपूज्या निराश्रया
सर्वज्ञा सर्वतो भद्रा सर्व मंगल मंगला।

**कूर्म पुराण –**

एकं सर्वगतं सूक्ष्म कूटस्थं अचलं ध्रुवम्।
योगिनः ते प्रपश्यन्ति महादेव्याः परं पदम्।
परात्परं तत्वं शाश्वतं शिवं अच्युतम्।
अनन्ते प्रकृतौ लीनं देव्याः तत् परमं पदम्।

**शिवपुराण –**

पुल्लिंग अखिलं धत्ते भगवान पुरशासनः।
स्त्रीलिंगं चाखिलं धत्तं देवी देव मनोरमा।

पुराणातून शक्ति माहात्म्य वर्णन आढळते. महाभारतकाळी शक्तिपूजा होती. भीष्म पर्वात दुर्गा स्तवन आहे. अर्जुनाला देवी प्रसन्न झाली व 'तुला विजय प्राप्त होईल' असा वर दिला.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३२०३०

●●●

**दिशासाठी**

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

मनावर ताबा मिळवणं कठीण असलं, तरी शक्य आहे.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*बीज, मॉडेल व साधना या लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

## प्रास्ताविक

दिशाच्या मागील अंकात आपण 'अनुभूती शास्त्राचा' अभ्यास अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादले. एव्हढेच नव्हे तर हे जाणले की, 'वैश्विक सत्य' - ह्याचे 'खरे प्रमाण', अंतरगात घेतलेल्या 'अनुभूतीवर' जाणले जाते. ह्या सत्यज्ञानाची अनेक ''प्रमाणे'' ही बुद्धिवादावर, तर्कपद्धतीवर मानवी निर्मित शास्त्रांवर वगैरे आधारलेली असून ती खात्रीलायक जाणली जाऊ शकत नाहीत. 'अपरोक्षानुभूती' व 'श्रुती ज्ञान' (अपौरुषेय) ही त्याची 'सत्य' 'प्रमाणे' (Standard proofs about 'Truth') होत!!

## पण मग 'अनुभूती' म्हणजे काय?

ही सामान्य ज्ञानबोध जाणिवेपेक्षा वेगळी कशी? श्रेष्ठ का? आणि अध्यात्मस्तरातील ह्या 'अनुभूती' घेण्याच्या साधना कोणत्या? त्यांचा आधार कोणता?


ह्या प्रश्नांची उत्तरे आजच्या सर्वसामान्य साहित्यात वा उपलब्ध साहित्यात स्पष्टपणे सापडत नाहीत. अनेक योगी व संत व साक्षात्कारी पुरुषांनी ह्या अनुभूती प्रत्यक्ष घेतल्या, अनुभवल्या व त्यांना खरे वैश्विक सत्याचे 'अर्थबोध' प्राप्त झाले. पण, त्यांचे 'शास्त्र' मात्र अव्यक्त अलिखित व आगमशास्त्रातच पूर्णपणे अनिर्वचनीयच राहिले!!

## हे आहे अनुभूती शास्त्र

आपण ह्या प्रश्नांचा व त्यांच्या उत्तरांचा मागोवा घेणार आहोत. कारण, हे ज्ञान वेदकाळातील समाजाला पूर्णपणे माहीत होते व त्याचा गुरु, शिष्य परंपरेने भारतीय संस्कृतीला युगा युगात वारसा लाभला. पण, आज ह्या मितीला हे ज्ञान दुरान्वयानें देखील 'स्पष्टपणे' त्याच्या साधना स्वरूपात ज्ञात नाही. एव्हढेच नव्हे, तर त्या अनुभूतीशास्त्राची महत्ता किती मोठी आहे, याची सुद्धा विलक्षण जाणीव शिल्लक राहिली नाही. ह्याचे एक कारण विश्वातील व्यक्ता-अव्यक्त विभागीय रचना व अध्यात्मशास्त्रातील जीवात्म्याच्या प्रवासाची चौकट व चैतन्य प्रवासाची माहिती व जाणीव नष्ट झाली.

## आत्मानुभूती हवी

प्रथम हे आवश्यक आहे की आपण पाहिले की ह्या पृथ्वीवरच्या प्रवासात आत्मा (जीवात्मा) हा 'ज्ञाता' (Knower) आहे. Receiver of Knowledge म्हणजे ज्ञानाचा खरा साधक आहे. ह्या आत्म्याला जे नाशिवंत शरीर लाभले आहे. त्याच्याशी एकात्म तत्वाने जोडले आहे. त्या शरीराला ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये ही जन्मसिद्ध प्राप्त आहेत. त्यांच्या मदतीने जीवात्मा प्रथमतः व सर्वसाधारण सहजतेने हा जीवात्मा प्रकृतीतील भोग, सुख, दुःख, भौतिक ह्याच्या अनुभूती ज्ञान पैदा करतो. पण त्याला स्वतः कोण आहोत, शरीर व त्याचा संबंध कुठल्या तत्वावर व कशासाठी जोडला गेला आहे, कोणी ही यंत्रणा निर्माण केली, कोणत्या उद्दिष्टांनी निर्माण झाली, याचे आजिबात ज्ञान नसते. एव्हढेच नव्हे तर पूर्वजन्मातील ज्ञानाचे, संस्कारांचे 'कर्माशयाचे' ज्या 'चित्तात' ज्ञान उमजते व संचित होते तेही माहीत नसते. आपण पाहिले की हे



जाणण्यासाठी अंतःकरण चतुष्टयामध्ये चित्त, बुद्धी, मन व अहंकार या चीजा असतात. त्यांतील अहंकार म्हणजे 'मी' तत्व होय. ही सर्व सूक्ष्म शरीराची अंगे होत.

'चित्त' हे व्यष्टि म्हणजे व्यक्तिनिष्ठ असते व त्याचा आत्म्याशी संबध प्राणशक्तिच्या स्थूल शरीर व सूक्ष्म शरीराच्या अनेक नाडी समुच्चयतेने जोडलेला असतो. शिवाय, हा संबध 'सुवर्णसूर्य' वा 'स्वर्ण प्रकाश' तत्वाने जाणला जातो म्हणजे, सुवर्णाची कांति केवळ सूर्यप्रकाशामुळे जाणवते. हया प्रकारे आत्म्याच्या प्रकाशात फक्त चित्त झळाळते, व्यक्त होते, असे म्हणा हवे तर!! 'सूक्ष्म शरीर' हे तर प्राणशक्तीने स्थूल शरीराशी जोडलेले असते. तसेच कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये ही त्यांच्या अंतर्गत परावर्तित केलेल्या दृष्टिमार्फत योगिक साधनेने, 'शरीर बाह्य ज्ञानाचे' अंतरंगातील अनुभूतीमध्ये, परावर्तित



जाणिवेच्या मार्फत होते. पुढे चित्तामार्फत पूर्वजन्मीचे व तीन व्याहती (भूः, भुवः, स्वः - गायत्री) द्वारे हया जड जीवनाचे ज्ञान त्यांच्या अनुभूतींत जीवात्म्याला हे संस्कारित 'ज्ञान' प्राप्त होते. त्यामुळे 'ईश्वरीज्ञान', ज्याला आपण एरव्ही पारखे असतो, ते ज्ञान, हया विलक्षण यंत्रणेमार्फत जीवात्म्याला होत रहाते!!

ही ज्ञानाची संस्कारक्रिया जास्त यशस्वी व प्रभावी करणे हे खऱ्या योगिक साधनेचे, काम असते!!


### सूक्ष्म ज्ञान व संयमाची योग साधना

या साधनेत 'सूक्ष्म ज्ञानासाठी 'संयम' हया शास्त्रीय मन व प्राण यंत्रणेचा योगिक वापर करावा लागतो. एरवी

'संयम' ह्याचा जो 'मानसिक अर्थ' आपल्याला माहीत आहे. त्यापेक्षा 'संयम' ह्याचा 'योगिक अर्थ' व यंत्रणा अगदी वेगळी आहे. पातंजल योगावरील भाष्यांत ह्याचे पूर्ण वर्णन मिळते. खरे म्हणजे ह्या योगिक साधना व मानवी शरीर अंतःकरण मन, प्राण ह्यांच्या ह्या क्रिया ज्या योग साधनेने प्राप्त होतात. त्याची जाण व कौतुक समाजात दिसत नाही.

ध्यान-धारणा-समाधि-तूर्या अवस्था ह्या सांखळी पद्धतीने जो ध्यानातील मूळ विषयाचा अंतत्रटिक युक्तीने मन व प्राण यांच्या संयुक्त कृतीने एक चित्त ध्यास केले जाते. त्या 'ज्ञानाच्या प्रवाहाचा' अर्थबोध व सत्यज्ञान हे समाधीच्या 'असंप्रज्ञात' स्थितीमध्ये प्राप्त होते.

THE DIFFERENT YOGIC PLEXUSES



**Step by Step**

हे सर्व आपण आता पायरी पायरीने समजून घेऊ या. अर्थातच सूत्र पद्धतीने प्रथम पाहू या. जर दुर्बोध वाटले तर दिशाच्या पुढील अंकातून त्याचा विस्तार अथवा भाष्य करू.

१. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध ह्याचे बाह्य ज्ञान नाडी समुच्चयामार्फत होते. ह्या नाड्या सर्व शरीरभर पसरलेल्या/दृश्य/अदृश्य असतात आणि त्यांचा संबंध 'सुषुम्ना नाडी'शी जोडलेला असतो. ह्या नाडीमार्फत प्राणशक्तीचा प्रवाह होत असतो.

२. प्राण **सूक्ष्म शरीराचा** (५ ज्ञानेंद्रिये, तन्मात्रा, ५ प्राण, मन, बुद्धी वगैरे १७ वस्तुंचा समुदाय) स्थूल शरीराशी जोडून असतो. प्राण गेल्यास सूक्ष्मशरीर आत्म्याबरोबर पुढचा वैश्विक प्रवास (देवयान किंवा पितृयान मार्ग) करतो.

३. **संयम**-ही धारणा,ध्यान-समाधि ह्या क्रमाने होणारी क्रिया आहे.

४. **चित्ताला** कुठल्या तरी '**देश विशेष**'ला बांधणे म्हणजे **धारणा** होय.

'देश' म्हणजे काय? हे पुढीलप्रमाणे-नाभिचक्र, हृदय, मूर्धाज्योति, नासिका अग्र, जिव्हेचा अग्र व ह्यावर कोणत्या एकावर वृत्ति जोडणे ह्याला '**धारणा**' म्हणतात.

५. शरीराच्या आंतरिक अंगात स्थिरचित्त एकाग्रतेने करणे - ही क्रिया म्हणजे 'धारणा' होय.

६. ह्यानंतर एखाद्या 'विषयावर' आकलन करून चित्त एकाग्र ठेवले की **ध्यान** सिद्ध झाले.

७. ह्या ध्यानाचा अविरत, अनिरुद्ध प्रवाह सुरु झाला की **समाधि** प्राप्त होते, सिद्ध होते.

८. ह्या समाधीच्या पुढच्या अंगात प्रवेश म्हणजेच

संग्रहामुळे भय वाढतं तर अपरिग्रहामुळे भयमुक्त होता येते.

ह्यालाच '**संयम क्रिया**' असे म्हणतात. हा '**योगिक संयम**' होय.(मानसिक संयम असा अर्थ नव्हे हे स्पष्टपणे जाणले पाहिजे.)

९. पुन्हा एकदा लक्षात ठेवा की धारणामध्ये ज्या विषयाला 'आलंबन' केले आहे त्याच्याशी एकरुपता ठेवणे त्याला 'ध्यान' ही क्रिया म्हणतात.

१०. ध्यान ज्या विषयावर करावयाचे त्याचे प्रथम 'शब्दज्ञान' (सत्यज्ञान) होणे आवश्यक असते.

११. ज्यावेळेला ध्याता, ध्यान व ध्येय ह्या तीन गोष्टी पृथक / वेगळ्या राहिल्या नाहीत. तेव्हा समाधी सिद्ध झाली असे समजावयाला हरकत नाही.


१२. अगोदर ज्या प्रवाहाचा उल्लेख केला त्यालाच 'सदृश्य प्रवाह' असे नांव आहे. ह्या प्रवाहात **आत्मा** आणि **चित्त** भिन्न रहात नाहीत. ह्यालाच योगाच्या पातंजल शास्त्रात '**प्रत्ययैकतानता**' अशी संज्ञा आहे. सूत्र आहे "**प्रत्ययैकतानता ध्यानम्**"।।२।।

१३. ह्या क्रियेत **धारणाच्या देशात** ज्ञानाचा समान प्रवाह चालू रहातो त्यालाच **ध्यान** म्हणतात.

**एकत्रित संकलन**

सामान्य वाचकाला हे पुष्कळच क्लिष्ट वाटेल याची जाणीव मला आहे. पण, ह्या क्रिया किंवा हे भाष्य कुठेही एकत्रित मिळणार नाही. काश्मीर 'शैविझम' (अभिनव गुप्त), शिवसूत्र, स्वामी विष्णूतीर्थ महाराज ह्यांचे भाष्य, पातंजल योग दर्शन-व्यास भाष्य-व्याख्याकार-सतीश आर्य वगैरे यांच्या वेगवेगळ्या स्वतंत्र शास्त्रातून व ग्रंथातून ह्या संकल्पना व 'साधना ज्ञान' एकत्रित करुन 'अनुभूती शास्त्र' ह्या एका विषयावर व उद्दिष्टावर ही माझी साधना संपादन कृती शक्य तितक्या सुलभतेने मांडली आहे!!

ह्या प्रयत्नांचा हेतू हाच आहे की महामहोपाध्याय



बाळशास्त्री हरदास यांनी ज्या 'अनुभूती वादाचा' व 'अनुभूती शास्त्राचा' गौरवपूर्ण उल्लेख त्यांच्या 'वैदिक राष्ट्र दर्शन' पुस्तकातून केला. त्याला पूरक असा योगिक साधनेचा सामान्य माणसाला लाभ होणे, मला आवश्यक वाटले. म्हणूनच हा संशोधन व स्पष्टीकरण प्रपंच केला आहे!!

**तत्त्वज्ञान की अनुभूतिवाद भारतीय बैठक?**

महामहापोध्याय बाळशास्त्री हरदास ह्या 'अनुभूतिवादाला अतिशय प्राधान्य देतात. ते म्हणतात की:-

"किंतू भारत में तत्त्वज्ञान की निर्मिती केवल मस्तिष्कप्रधान लोगों के बौद्धिक विलास के लिए ही नही हुई है।" पुढे ते म्हणतात:-

"भारतातील तत्त्वज्ञानाचा विचार हा पुरुषार्थ मीमांसेचा एक भाग म्हणून महत्त्वास चढलेला आहे. जीवनात काहीतरी घडवावयाचे आहे व त्यासंबंधाचे

दिग्दर्शन तत्वज्ञानशास्त्रच करू शकेल म्हणूनच येथे म्हणजे भारतात तत्वज्ञान उपलब्ध झाले. सृष्टिकर्त्याने 'मानवी जीवन' आपली एक विशेष स्वरूपाची देणगी म्हणून, जीवाला दिलेले आहे व त्याचा उपयोग विशेष पद्धतीनेच केला पाहिजे अशी भारतीय तत्त्वज्ञांची दृढ धारणा आहे.''

**ह्या जीवनातील पुरुषार्थ कोणता?**

त्यानंतर त्यांनी 'पुरुषार्थ विचार व तत्वज्ञान' ह्याच्या द्वारा 'प्रत्यक्षानुभूती'च्या स्तरावर झालेल्या 'अनुभूती Stet' उल्लेख केला. ह्या 'अनुभूतिवादाचा' प्रत्यय रमण महर्षि अरविंद घोष, स्वामी विवेकानंद, रामकृष्ण परमहंस वगैरेंनी घेतला व त्याचा प्रसार केला. हे आवर्जून सांगितले.

त्याच्यापुढे जाऊन त्यांनी ह्या 'अनुभूतिवाद शास्त्राचा पुरावा भगवद गीता, उपनिषदे, ऋग्वेद, संत वाङमयातून असंख्य पुरावे मांडून व उद्‌धृत करुन भारतीय संस्कृतीतील एक अत्यंत महत्त्वाच्या वैशिष्ट्याचा अभिमानास्पद आग्रह धरला की 'जो आज समाजाच्या विचारातून व साधनांतून लोप पावला आहे.' परंतू भारतीय वैदिक ज्ञानाच्या सीमा स्थूल देहाच्या ज्ञानेंद्रियाच्या पलीकडे गेल्या होत्या. त्याचा आपल्याला रास्त अभिमान वाटावयाला हवा. हे ज्ञान जतन व संवर्धन करावयाला हवे.

जिथे इंद्रियगम्य ज्ञान 'जड' परिसरातच बद्ध आहे व जिथे आमचे ऋषि मुनी इंद्रियातील ज्ञानाची जाण घेतात व वर्णन करतात ते ज्ञान 'अनुभूतिवाद व अनुभूतिशास्त्राच्या प्रांतात येते.'

**हे ज्ञान जीवात्म्याचे बुद्धीचे नव्हे!!**

मग हे ज्ञान कुणाला होते? अर्थातच जीवात्म्याला आणि कसे? ते आपण अगोदर पाहिले, की ते चित्त, आत्मा व योगाच्या 'संयम' शास्त्राच्या साधनेने होते.

एवढेच नव्हे तर जिथे 'Reason is barred' बुद्धियंत्राची सीमा संपते. ईश्वरी ज्ञान त्याच्याही सीमेच्या पलीकडे आहे, त्या ज्ञानाला 'अनुभूतिशास्त्र' उत्तर देते व त्याला अनुषंगिक साधनाशास्त्र पैदा होते.

हे प्रत्यक्ष आत्मदर्शन आहे. खरे पाहता ज्ञानाची जिज्ञासा व लालसा ही जीवात्म्याचीच स्थिती व वृत्ती आहे. आपण जडवादी सामान्य माणसे नकळत देहाच्या भूमिकेतून त्यांचा विचार करतो. ही चूक युगानुयुगे जन्मलेला सामान्य मानवी जीव (देहबद्ध आत्मा) करत आला आहे. फक्त भारतात ह्या कोड्याचा उलगडा शास्त्रोक्त पद्धतीने केला गेला आहे. त्यामुळे खरे ज्ञान हे आत्मज्ञानाचा संभार असला पाहिजे व त्याचा संभाळ व वृद्धि ही जन्म जन्मांतरी, जन्म, पुनर्जन्म व मुक्ती ह्या क्रमात सूक्ष्मशरीर अंतःकरण चतुष्टय व मुख्य म्हणजे 'चित्त' ह्या चिरकाल किंवा अनंतकाळ टिकणाऱ्या 'सामुग्री यंत्रणे'मार्फत होत रहाते.

तैतरिय उपनिषदात एका श्रेष्ठ कवीने आपल्या उन्मन अवस्थेमध्ये जाणते की ''मी अन्न आहे, मीच अन्न खानेवाला आहे.'' थोडक्यात म्हणजे ज्ञान, ज्ञेय, ज्ञाता यांची 'त्रिपुटी एकत्व' त्याने 'अनुभूती' जाणीवेने जाणले. हे त्रित्व समाप्त झाले. तेव्हा प्रश्न महत्वाचा हा की ह्या इंद्रियातील ज्ञानाचा जीवात्म्याला फायदा कसा होतो? त्याच्या साधनेच्या यंत्रणा कोणत्या?

पातंजल योगदर्शन (व्यासभाष्य एवं भोजवृत्तिसहित) ह्यावरील सतीश आर्य यांच्या व्याख्यामध्ये ''हृदये चित्तसंवित'' ।।३४।। ह्या विभूतिपाद ह्या प्रकरणात ते महर्षि व्यास ह्यांचे भाष्य कथित करतात. ''ब्रह्मपुरे दहरं पुंण्डरिकं वेश्म तत्र विज्ञानम्....

ह्याचा अर्थ 'हृदयांमध्ये संयम केल्याचे फळ योग्याला हृदयातील चित्त ज्ञानाची प्राप्ती होते.

**हे हृदय व चित्त यांचे खरे स्थान. पण हे 'हृदय' कोणते?**

स्वार्थापोटी जो दुसऱ्याला बाद ठरवायला पाहतो, तो भगवंतांना प्रिय होत नाही.

महर्षी दयानंदाच्या मते ''कंठ के नीचे, दोनो स्तन के बीच में और उदरके उपर जो हृदय देश है, जिसका ब्रह्मपूर अर्थात परमेश्वर का नगर कहते है, उसके बीच जो गर्त है, उसमे कमल के आकार वेश्म अर्थात अवकाशरूप एक स्थान है और उसके बीच में जो सर्वशक्तिमान परमात्मा बाहर और भीतर एक रस होकर भर रहा है, वह आनंदस्वरुप परमेश्वर इसी प्रकाशित स्थान के बीच में खोजा करने से मिल जाता है। दूसरा उसके मिलने का कोई उत्तम स्थान वा मार्ग नही है। (ऋ. भू. उपासनाविषय)

त्या अवकाशरूप स्थानाला महर्षि व्यास 'विज्ञान' स्थान म्हणताहेत. विज्ञानाचे तात्पर्य म्हणजे इथे 'सम्यक ज्ञान आणि विविध ज्ञानाचे साधन - ''चित्त'' आहे. चित्त हे जीवात्म्याच्या सूक्ष्मशरीराचे एक अंग आहे आणि ज्यात जीवात्मा परिवेष्टित रहातो.

त्यामुळे संक्षिप्तपणे योग्याच्या 'संयम' करण्याने ह्या चित्ताने ग्रहण केलेले ज्ञान प्राप्त होते.

### ज्ञान संकल्पनेचे अवलोकन

पुन्हा एकदा मागे वळून मानवाला ह्या पृथ्वीवरील त्याच्या १०० वर्षे सरासरी आयुष्याच्या कालखंडात कुठचे ज्ञान आवश्यक आहे व कुठचे ज्ञान तो जतन करु इच्छितो? देह मृत्यू ही तर न टळणारी गोष्ट आहे ना? मग व्यवहारी जीवनात ज्या 'ज्ञानाची' आवश्यकता आहे ते जिवंतपणी मिळवणे व उपयोग करणे आवश्यक आहे, हे निर्विवाद आहे. जसे उदरनिर्वाहाचे साधन, संसार चालवण्याकरिता लागणारे ज्ञान व आधार आदी ज्या समाजात जगावयाचे त्याबद्दल लागणारे ज्ञान हे तर कुवतीप्रमाणे मिळवतोच, पण मृत्यूनंतर ह्या ज्ञानाच्या स्वरूपाबद्दल बोलावयाचे झाल्यास, हे ज्ञान देहाबरोबरच निर्माल्यवत होणार हे उघडच आहे. भौतिकवादाची ही ज्ञानाची धारणा व सीमा आहे. 'आहार, निद्रा, भय, मैथून' ह्या सीमेत वावरणाऱ्या प्राणिवत मानवी जीवनाला ही खंत जरासुद्धा तीव्रतेने जाणवते आहे असे दिसत नाही.

### आध्यात्मिक जीवन हे सत्य भारतीय संस्कृतीत

ह्या खेरीज मानवी जीवनाचा वैश्विक स्वरूपात काही निराळा दृष्टिकोन आहे की नाही? भारतीय तत्वज्ञानात मृत्यूनंतर 'जीवात्मा' जन्म, मृत्यू, पुनर्जन्म ह्या वैश्विक फेऱ्यात फिरत रहातो, असे चित्र भारतीय संस्कृतीच्या विश्वासात, श्रद्धेत आहे. ते चूक असले, तर ह्या जीवन चित्रपटाचा शेवट मृत्यूत होतो व नंतर ह्या विश्वातील पृथ्वीवरील चित्रपटगृहात अंधार पडला पाहिजे. असाच होतो का? पण असे होताना दिसत नाही. पृथ्वीवरील जीवन युगेन युगे अनंत काळपर्यंत चालणारे वास्तव आपण पहातो आहे. एवढेच नव्हे, तर मानवी जीवन, देशादेशातील विशेष संस्कृती प्रकार आपल्या वैशिष्ट्याने व जीवनदृष्टीने एखाद्या 'रिले रेस'सारखे ज्ञान प्रवाहाचे, संस्कृतीप्रवाहाचे एवढेच का त्यातील विवादांचे ही सातत्य पिढ्या नि पिढ्या चालू राहिलेले बघतो. 'कॉशसनेसची' उंची, पातळी वाढताना पहातो. हे सर्व मग कोणत्या तत्वांवर आधारलेले आहे?

महायोगी अरविंद ह्यांच्या मते हा जीवन प्रवाह व्यष्टि समष्टि सृष्टि यांच्यामधील देवघेवीवर, संक्रमणावर उत्क्रांती तत्वावर चाललेला आहे. त्याचा छुपा हेतू हा मानवी 'अभीप्सा' 'Aspiration' 'अभीप्सा' ह्या जन्म जन्मांतरीच्या सातत्याच्या बीजगुणांवर चालतो. 'The Problem of Rebirth' ह्या व त्यांच्या इतरही लिखाणात पुनर्जन्म ही गोष्ट तर्कसंमत आहे, असे ते म्हणतात व ती एक 'Logical Necessity' किंवा एक 'तर्कदुष्ट आवश्यक' चीज आहे असे मानतात. तरच उत्क्रांती व Evolution of Consciousness ह्या संकल्पनांना अर्थ प्राप्त होतात!!

### नारदाला हवे आत्मज्ञान

भारतीय Mythology पुराणकथामध्ये एक किस्सा

आहे. नारद सनत्कुमार ह्या आपल्या सद्गुरूकडे गेल्यावर सांगतात की, "मी सगळे वेद, इतिहास, पुराण, पितृविद्या, मंत्रविद्या, गणितशास्त्र, शकुनशास्त्र, तर्कशास्त्र, नक्षत्रविद्या, कला वगैरे सगळ्या उपलब्ध ज्ञान व विद्या मिळवल्या. पण, मला दुःखसागरातून तरून जाण्याकरिता काहीही उपाय गवसला नाही!! मी केवळ एक 'मंत्रविद् व शब्दपंडित' झालो आहे.

मला मी कोण आहे ह्याबद्दलचे "आत्मज्ञान" प्राप्त झालेले नाही.

मला मदत करा व हे ज्ञान मिळवण्याचा उपाय सांगा."

गंमत अशी आहे की ज्या भौतिक विद्या, जड ज्ञान नारदाने प्राप्त केले त्यापासून त्याला 'स्वतः तो कोण आहे" त्याचे प्रत्यक्ष ज्ञान झाले नाही. त्यांना हवे आहे आत्मज्ञान!!

हे देहबद्ध जीवात्म्याला स्वतःच्याच आत्म्याचे दर्शन व ज्ञान होते, हेच त्यांच्या प्रश्नाचे उत्तर आहे.

का बरे?

कारण, हे ज्ञान झाल्यावरच ब्रह्मज्ञानाचा मार्ग खुला होतो!! आणि ब्रह्मज्ञान झाल्यावर :॥

भिद्यते हृदयग्रंथिः छिद्यन्ते सर्वसंशयः ।

क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे॥ मु.०२.२.८

प्रत्यक्ष ब्रह्मदर्शन व ज्ञान झाल्यावर हृदयग्रंथी छिन्न भिन्न होऊन जातात, सगळे संशय मिटतात व समाप्त होतात.

ब्रह्मानंदाची प्राप्ती होते. वगैरे वगैरे!!

त्यामुळे ज्या प्रश्नांची उत्तरे, युगे नि युगे मानवी समाज आपल्या बुद्धी व मानवी तर्क व बुद्धीवर आधारलेल्या तत्वज्ञान, धर्म, विज्ञान वगैरे "भौतिकवादी ज्ञान मार्गाने मिळवतो आहे, त्याची उत्तरे आजवर मिळाली नाहीत. फक्त आश्वासने आहेत ही समस्या आहे. भौतिकवादी विज्ञानाची ही सीमा आहे॥

**अनंतातले प्रश्न?**

"मी स्वतः कोण आहे?"

"हे जग काय आहे, कोणी निर्माण केले? का?"

"माझ्या शरीराची व जीवनाची निर्मिती का व कशासाठी?"

"माझे अज्ञान, माझे भासात्मक जीवन व माझा मृत्यू ह्या चीजा काय आहेत?"

ह्यांची उत्तरे ज्या शास्त्रात निःसंशय मिळतात त्याचे नांव "अनुभूतिशास्त्र" आहे व त्याची 'साधना योगशास्त्रात' संकलित केली आहे. आपल्याला हे नष्ट झालेले ज्ञान वा विस्मृतीत गेलेल्या साधना पुनर्जीवित करावयाच्या आहेत. कारण हे उत्तर फक्त भारतीय संस्कृतीने दिले आहे!!

हे उत्तर भारतीय संस्कृतीने दिले आहे!!

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,

सारस्वत बँकेशेजारी,

अग्यारी लेन, ठाणे.

दूरध्वनी - २५३६८४५०

मोबाईल - ९००४०५१८४७

E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

स्वतःला जे हवंय त्याची स्पष्ट कल्पना असली की गोंधळ नसतो.

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

**नेमेचि येतो मग पावसाळा**
**हा सृष्टीचा खेळ सारा**

त्याप्रमाणे दि.१५/०६/२०१२ पासून शाळेचे नवीन वर्ष सुरू झाले. शालेय जीवनातील पहिलेच पाऊल असल्याने थोडीशी हसत तर थोडीशी रडत, उत्सुकतापूर्ण भावनेची लहान व मोठ्या शिशुची मुले शाळेत हजर राहिली. पहिल्याच दिवशी पताका, फुगे यांनी सजवलेल्या वर्गात मुलांचे गोळ्या देऊन स्वागत करण्यात आले.

**पालकसभा :**

वर्षाभरातील अभ्यास, शाळेत होणाऱ्या स्पर्धा, उपक्रम व सण कसे साजरे केले जातात ते सविस्तर सांगण्यासाठी लहान व मोठ्या शिशुची पालकसभा घेण्यात आली.

**आषाढी एकादशी :**

प्रतिवर्षाप्रमाणे आषाढी एकादशीला मोठ्या शिशुंची दिंडी काढण्यात आली. ज्ञानेश्वर, मुक्ताई, निवृत्तीनाथ, विठ्ठल-रखुमाई यांच्या वेषात मुले-मुली वारीत सामील झाली होती. वारीचे महत्त्व विद्यार्थ्यांना पण समजावे या उद्देशाने दिंडी काढण्यात आली होती. रिंगण, फेर, गजर यांनी तर पूर्ण शाळा दुमदुमून गेली होती.

**गुरु पौर्णिमा :**

गुरुंची महती, गुरुंविषयी आदर वाढविण्यासाठी 'गुरुपौर्णिमा' हा सण साजरा करतात. मुलांमध्ये ही भावना रूजू होण्यासाठी लहान-मोठ्या शिशुमध्ये गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. या दिवसाचे महत्त्व समजण्यासाठी प्रत्येक गटातून एक-एक गुरुशिष्याची जोडी करण्यात आली. त्याचप्रमाणे गुरु-शिष्यांची महती सांगणाऱ्या गोष्टी मुलांना सांगण्यात आल्या.

**दीपपूजा :**

एकदा काय झाले?
आमच्या घरातले दिवेच गेले
सगळीकडे काळोख मिट्ट.
बाळाने पकडले आईला घट्ट
आजी गेली देवघरात
तिने लावली समईची वात
अंधार सगळा गेला पळून
समईची करामत आली कळून

असे गाणे म्हणून प्रत्येक दिव्याची माहिती सांगून दीपपूजा करण्यात आली. सर्वत्र शुभकारक घटना घडोत, सर्वांचे कल्याण होवो, सर्वांना आरोग्य, धन प्राप्त होवो, वाईट बुद्धीचा नाश होवो, व आपल्या जीवनातील अंधःकार नाहीसा होऊन आपले जीवन प्रकाशमय बनो अशी प्रार्थना मुलांनी दिव्यांजवळ केली.

**नागपंचमी :**

श्रावण महिना म्हणजे सणांची रेलचेल. लहान मुलांच्या मनामध्ये नाग, साप यांविषयी कुतूहल व भीती या भावना असतात. परंतु नाग हे शेतकऱ्यांचे मित्र असतात व त्यांना कधीही मारू नये ही भावना रुजवण्यासाठी 'नागपंचमी' हा सण साजरा करण्यात आला. नंतर पारंपरिक पद्धतीचे खेळ (फुगड्या, झिम्मा) इ. सर्व शिक्षक व मुलांनी फेर धरून मुलांना करून दाखवले. नागाबद्दल असणाऱ्या कहाण्या सांगून नागाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

**श्रावणी शुक्रवार :**

श्रावण महिन्यातील शुक्रवारी जिवतीची पूजा करून चण्याचा नैवेद्य दाखविला. घरातील मुलाबाळांना पुरणाच्या दिव्याने ओवाळतात याचे महत्त्व सांगून सर्व मुलांचे औक्षण केले.

**रक्षाबंधन :**

भावा-बहिणीमधील नात्याचे पावित्र्य मुलांना समजावें यासाठी 'रक्षाबंधन' हा सण साजरा करण्यात आला. मुलांना भेटवस्तू म्हणून मुलींना देण्यासाठी टिकल्यांची पाकीटे आणावयास सांगितली. प्रत्येक मुलीने एकेका मुलाला राखी बांधली. नंतर सर्व मुलांना औक्षण केले. नारळीपौर्णिमेचे महत्त्व समजण्यासाठी मुलांना त्याची माहिती सांगितली.

**उपक्रम :**

मुलांना विविध रंगांचे ज्ञान होण्यासाठी व त्या रंगाच्या वस्तू समजण्यासाठी रंगांचा परिचय घेतला जातो. त्यासाठी लाल व पांढऱ्या रंगाच्या वस्तू मुलांना आणावयास सांगितल्या होत्या. प्रत्येक वर्गात त्या रंगाच्या वस्तू व त्याचे ज्ञान (परिचय) मुलांना देण्यात आले. १५ ऑगस्टसाठी मुलांकडून झेंडे बनवून घेण्यात आले.

**दही-हंडी:**

लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना आवडणारा सण म्हणजे 'दही-हंडी' (गोपाळकाला). हा सण शाळेत साजरा करण्यात आला. शाळेच्या हॉलमध्ये दही-हंडी बांधण्यात आली. डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभागातील बालगोपाळच्या पथकाने एकमेकांवर थर रचून हंडी फोडली. सर्व मुला-मुलींनी दही-हंडीच्या गाण्यांवर नाच केला व दही-पोह्याचा नैवेद्य दाखवून तोच प्रसाद मुलांना वाटण्यात आला.

## सौ. आनंदीबाई इंग्रजी माध्यम प्राथमिक विभाग

आषाढी एकादशी निमित्त इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी दिंडी काढून त्यामध्ये विठ्ठलाच्या नामाचा गजर, भजन व टाळ यांच्या समवेत 'शिस्त' ह्या विषयावर कीर्तन केले. रस्त्यावर, कार्यालयात, शाळेत शिस्त ही पाळली गेली पाहिजे, यावर कीर्तनात भाष्य होते.

नागपंचमीच्या दिवशी नागाच्या प्रतिकृतीची पूजा करून मुलांना नागदेवतेचा आपल्या व शेतकऱ्यांच्या जीवनात वाटा असतो, ह्याचे महत्त्व सांगून त्या संदर्भातल्या गोष्टीही सांगण्यात आल्या.

रक्षाबंधन हा उत्सव इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी राखी बनवून व आपल्या मित्र-मैत्रिणींना बांधून त्यांची जपणूक व रक्षण करण्याचा संदेश एकमेकांना दिला.

कृष्णजन्माष्टमीला इ. १ली च्या विद्यार्थ्यांनी 'कृष्ण कालिया मर्दन' हे नाटक सादर केले व 'गोविंदा आला रे...' च्या जल्लोषात मोठ्या उत्साहाने मुलींनी दहिहंडी फोडली.

स्वातंत्र्यदिनानिमित्त इ. १ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांनी झेंडा बनवून वेगवेगळी देशभक्तिपर गीते गाऊन व झेंड्याची काळजी व देशाप्रती प्रेमाची भावना व्यक्त करून साजरा केला.

प्रथमच 'हिंदी भाषा' ह्या विषयावर 'हिंदी दिवस' तिसरीच्या मुलांनी हिंदीतून प्रतिज्ञा, प्रार्थना, कविता, गाणी, दोहे वैगरे सादर केले व वंदे मातरम् गाऊन समारोप केला.

जिल्हास्तरीय शालेय जलतरण स्पर्धा कार्यक्रम दि. १० व ११ सप्टेंबर २०१२ या दिवशी आयोजित केला होता. त्यात चि. ओंकार समीर राऊत इ. ४ थी अ याने प्रथम क्रमांक पटकावला व त्याची निवड विभागस्तरीय शालेय जलतरण क्रीडा स्पर्धेसाठी झालेली आहे.

**सौ. आनंदीबाई इंग्रजी माध्यम माध्यमिक विभाग**

**आंतरशालेय नाटिका स्पर्धेचा निकाल :**

रोटरी क्लब ऑफ ठाणे आयोजित 'ऊर्जा वाचवा' या आंतरशालेय नाटिका स्पर्धेत इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांनी दुसरे पारितोषिक पटकाविले.

**DSO आयोजित आंतरशालेय स्पर्धेचा निकाल :**

१४ वर्षाखालील पोहण्याची स्पर्धा -

कु. वैष्णवी देसाई हिला ५० मी. १०० मी. आणि २०० मी. ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये द्वितीय क्रमांक मिळाला.

कु. सृष्टी नाईक हिला ५० मी. बॅक स्ट्रोक मध्ये प्रथम क्रमांक, १०० मी. बॅक स्ट्रोक मध्ये द्वितीय क्रमांक व ४०० मी फ्री स्टाईलमध्ये तृतीय क्रमांक मिळाला.

रिले संघाला द्वितीय क्रमांक मिळाला. स्पर्धकांची नावे : कु. वैष्णवी देसाई, कु. सृष्टी नाईक, कु. सानिका जोशी आणि प्रज्ञा टेंडोलकर.

१७ वर्षाखालील मुली टेबलटेनिस संघाला स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले. स्पर्धकांची नावे : कु. रिद्धी संखे, कु. नेहा नवरे, कु. प्रणिता बनावली, कु. रसिका मोरे व कु. वैष्णवी गेजी.

१७ वर्षाखालील मुले टेबलटेनिस संघाला स्पर्धेत उपविजेता ट्रॉफी मिळाली. स्पर्धकांची नावे : कु. सिद्धेश पांडे, कु. श्रेयस पेंडसे, कु. राहुल धवल व कु. तक्ष सत्रा.

१४ वर्षाखालील लॉन टेनिस स्पर्धेत कु. गिरीश दिघे ह्याची जिल्हास्तरावर जिंकून मुंबई झोनल टूर्नामेंटसाठी निवड झाली.

**शांतता फलकलेखनाच्या स्पर्धेचा निकाल :**

लायन्स क्लब, कोपरी, ठाणे आयोजित इ. ६ वी चे खालील विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळाले :

१) प्रथम पारितोषिक - कु. संजना परांजपे

२) द्वितीय पारितोषिक - कु. मयुरी राणे

३) तृतीय पारितोषिक - कु. सिद्धेश करमरकर

४) उत्तेजनार्थ पारितोषिक - कु. अमेय दानोले, कु. वेदांत केळकर आणि कु. स्तुज बारगोडे.



हाँगकाँग येथे पार पडलेल्या ४५ व्या सामाईक शाळा विज्ञान प्रदर्शनामध्ये ठाण्यातील सौ. ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पास सर्वोत्कृष्ट लोकप्रिय प्रकल्प म्हणून गौरविण्यात आले.

यावर्षी हाँगकाँग येथे २३ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट, २०१२ दरम्यान हे प्रदर्शन झाले. त्यामध्ये हाँगकाँग येथील स्थानिक शाळांचे तसेच भारतासह चीन, तैवान, डेन्मार्क या देशांतील शाळांनी सुद्धा सहभाग घेतला होता.

ठाण्याच्या सौ. ए. के. जोशी शाळेतील अद्वैत भट, व विराज महाडिक या विद्यार्थ्यांनी पूर परिस्थितीत कमीत कमी मानवी हानी टाळण्याकरिता घ्यावयाच्या खबरदारीचे उपाय या विषयाचा प्रकल्प सादर केला होता. आमच्या शाळेला Most Popular Overseas Booth हा पुरस्कार जाहीर झाला.

इ. ९ वी तील कु. दीप बऊआ याला औरंगाबाद येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील ८ व्या 'ऑल इंडिया स्पीड स्केटिंग चॅम्पियनशीप स्पर्धेत तीन सुवर्ण आणि ४ रजत पदके मिळाली.

२६ जुलै, २००५ रोजी अतिवृष्टीमुळे झालेल्या मानवी व आर्थिक नुकसानी या विषयावरुन हा प्रकल्प सादर करण्यात आला होता. यामध्ये सखल भागात अतिवृष्टीमुळे पाणी साचल्यावरती त्याचा निचरा स्वयंचलित पद्धतीने कशा प्रकारे करता येतो व खबरदारी म्हणून तेथील परिस्थितीची उपग्रहावरुन माहिती मिळवून त्यावर कोणता उपाय करुन मानवी हानी व आर्थिक हानी कमी करावी या विषयी प्रकल्पामध्ये माहिती दिली गेली व त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले होते.

हा प्रकल्प करण्याकरिता अद्वैत भट व विराज महाडिक यांना त्यांच्या पालकांकडून व शिक्षकांकडून प्रोत्साहन व सहाय्य मिळाले होते.

**चीनमध्ये झालेल्या राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनाचा निकाल:**

चीन येथे झालेल्या २७ व्या 'China Adolescent Science & Technology Innovation Contest' मध्ये भाग घेण्यासाठी आमचे तीन विद्यार्थी कु. ओकार साठे, कु. अनय ताम्हाणे आणि कु. तन्मय भागवत व शिक्षिका सौ. अस्मिता मोहिले गेल्या होत्या. तेथे त्यांनी आमचा "Non Evaporating Tank for drought prone regions" हा प्रकल्प सादर केला आणि विशेष गुणवत्ता पुरस्कार प्राप्त केला. आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरवले जाण्याचे आमच्या शाळेचे हे पाचवे वर्ष आहे.

इ. ६ वी ची कु. वैष्णवी घाग हिने ठाणे काँग्रेस कमिटी तर्फे आयोजित ठाणे शहर मॅरॅथॉनमध्ये २ कि.मी. धावण्याच्या स्पर्धेत ७ वा क्रमांक पटकावून रोख रक्कमेचे बक्षीस मिळविले.

या प्रकल्पाचे सादरीकरण करण्याकरिता होमी भाभा विज्ञान संस्थेतील शिक्षण विभागाचे डॉ. सुधाकर आगरकर व विद्या प्रसारक मंडळाचे प्रबंधक श्री. रविंद्र रसाळ यांनी विद्यार्थ्यांना सहकार्य केले.

**जोशी - बेडेकर कला-वाणिज्य महाविद्यालय**

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंह ह्यांनी NAAC च्या "Peer-Team" च्या सदस्या म्हणून शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करिता नियुक्ती झाली. २३ ऑगस्ट ते २५ ऑगस्ट या दरम्यान गांधीनगर येथील महाविद्यालयाचे मूल्यांकन करण्यास गेल्या होत्या.

ग्रंथालय विभागातर्फे महाविद्यालयात Refresher Course in 'library and Information Science' या विषयावर मुंबई विद्यापीठाच्या U. G. C. Staff यांच्या संयुक्त विद्यमाने २४ ऑगस्ट ते १३ सप्टेंबर २०१२ या दरम्यान आयोजन झाले. त्यात ३३ ग्रंथपालांचा सहभाग होता.

महाविद्यालयातील "Students Forum" या समितीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची Live-in-Relationship या विषयावर गट चर्चेचे आयोजन केले. दि. ३ ऑगस्ट १२ रोजी झालेल्या कार्यक्रमास प्रा. सुचित्रा नाईक आणि प्रा. हेतल मिशेरी ह्या प्रमुख अतिथी होत्या. तसेच समिती अध्यक्षा प्रा. प्रज्ञा राजेबहादूर ह्यांनी अतिथी परिचय करून, संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केले.

अतिथींनी सामाजिक व मानसशास्त्रीय दृष्ट्या या विषयावर विद्यार्थ्यांशी साधक - बाधक प्रतिसाद लाभला. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. तनुजा शाह यांनी केले.

**अर्थशास्त्र विभागाचा वृत्तान्त :**

The use of library in economics या विषयावर प्रा. नारायण बारसे यांचे व्याख्यान झाले.

---

खूप मोठा पगार असला म्हणून समाधानाने दोन घास खाऊन शांत झोप येईलच असे नाही.

१४ ऑगस्ट रोजी 'Two dealors of Reforms in economics' या विषयावर प्रा. अदिती अभ्यंकर, रुईया महाविद्यालय; यांचे व्याख्यान आयोजन केले.

२२ ऑगस्ट रोजी Reserve Bank of India येथे तृतीय वर्षाची (Study visit) भेट घडवून आणली.

प्रा. दीपक सावळे यांनी 'Financials Developement and Economics Growth; with special referance to India या विषयावर Ph.D. (शोधप्रकल्प) मे - २०१२ रोजी सादर केला. प्रा. दीपक सावळे यांनी in International conference on finince and economics organized by Nepal Rashtra Bank, काठमांडू येथे शोध प्रकल्प सादर केला.

प्रा. सागर ठकर यांचे Ph.D. नोंदणीकरण पुणे विद्यापीठ येथे झाले.

मुंबई विद्यापीठाच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या UGC Academic staff college येथे Refreshor course मध्ये अर्थशास्त्र विभागातर्फे प्रा. दीपक सावळे यांचा सहभाग होता.



**सौ. प्रियंवदा टोकेकर विद्यापीठाच्या ''सावित्रीबाई फुले'' आदर्श शिक्षिका पुरस्कार स्विकारताना**

महाविद्यालयाच्या प्रा. प्रियंवदा टोकेकर, मुंबई विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराने (२०११-१२) सन्मानित करण्यात आले. प्रा. प्रियंवदा टोकेकर १९९२ पासून राज्यशास्त्र विभागात प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत १९९६पासून द्वितीय वर्ष कला यांना असणारा 'स्त्री विषयक 'अभ्यासक्रम शिकवितात त्या २००५ साली मुंबई विद्यापीठात 'Voices from the post-views of 19th century women social reformers या विषयावर लघु प्रबंध सादर केला. कौटुंबिक हिंसाचार, स्त्रियांचे राजकीय स्थान, ईकोफेमिनिझन या विषयावर निबंध सादर केले. त्याचप्रमाणे २००६-०७ पासून राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी आणि महिला विकास कक्षाच्या प्रमुख या माध्यमातून स्त्री - पुरुष समानता आणि महिलांचे सबलीकरण या विषयावर अनेक कार्यक्रमांचे आयोजन या त्यांच्या कार्याची नोंद घेऊन वरील पुरस्कार ५ सप्टेंबर १२ रोजी विद्यापीठात देण्यात आले.

मुम्बई विद्यापीठाच्या विद्यमाने यंदा जोशी -बेडेकर महाविद्यालयात ८ ऑगस्ट २०१२ रोजी ४५ वा युवामहोत्सव आयोजित करण्यात आला होता. एकूण २४ कलाप्रकारांचे विविध महाविद्यालयांनी सादरीकरण केले त्यापैकी २२ कला प्रकारांमध्ये जोशी बेडेकर महाविद्यालयाचे नाव उज्वल झाले. तसेच अंतिम फेरीमध्ये देखील अनेकानेक कलांमध्ये यश संपादित केले.

संस्कृत विभागातर्फे २२ ऑगस्ट रोजी 'संस्कृत दिन उत्सव' साजरा करण्यात आला कार्यक्रमास प्रसिद्ध गायक श्री. श्रीरंग भावे आणि रुईया महाविद्यालयाचे संस्कृत प्रा. श्री. प्रसाद भिडे अतिथी रुपात प्राप्त झाले. श्रीरंग भावेच्या गायनाने तसेच श्री. प्रसाद भिडे यांच्या 'संस्कृत भाषा आणि विदेश' या विषयावरील भाषणाने खूप रंगत आली. 'संस्कृत आणि विज्ञान' या विषयावर प्रदर्शनाचे तसेच 'वस्तुप्रदर्शन' सादर करून प्रत्येक वस्तूंचे संस्कृत नावे वस्तूसमोर लावून संस्कृत शब्द ज्ञान देण्याचा प्रयत्न केला गेला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा चांगला सहभाग लाभला.

हिंदी विभागातर्फे उपन्यासकार सम्राट प्रेमचंदजींच्या प्रसिद्ध गोष्ट 'कफन' यावर २९ जून रोजी लघु चित्रपट दाखविण्यात आला.

२६ जून रोजी 'अंतर्जाल और हिंदी' या विषयावर अग्रवाल महाविद्यालयाचे विभागाध्यक्ष डॉ. मनीष मिश्रा यांचे अतिथिय भाषण आयोजित करण्यात आले होते.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**विशेष नैपुण्य :**

कु. स्नेहा विजय गावडे ही संख्याशास्त्र विभागाची विद्यार्थिनी मुंबई विद्यापीठात सर्व विषयांमध्ये (९२.३४%) गुण प्राप्त करून चौथ्या क्रमांकावर व संख्याशास्त्र विषयांमध्ये तृतीय क्रमांकावर आली.

**अभिनंदन :**

प्रा. अभिजित काळे, I/C माहिती व तंत्रज्ञान विभाग यांची माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासमंडळात निवड झाली.

डॉ. आर. पी. आठल्ये, प्राणिशास्त्र विभाग आणि डॉ. अनिता गोस्वामी गिरी, रसायनशास्त्र विभाग यांनी Environment & Humanity Eco-Revolution - 2012 या श्रीलंका येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत, १८ ते २० ऑगस्ट २०१२ या दरम्यान शोधनिबंध सादर केले.

डॉ. सौ. पूनम कुर्वे आणि श्री सुदेश राठोड यांनी दि. ७ ते १० ऑगस्ट २०१२ रोजी बंगलोर येथील Biodiversity Asia 2012 कार्यशाळेत शोधनिबंध सादर केले.

**प्रा. प्रकाश माळी**, रसायनशास्त्र विभाग यांना लोकमान्य तरुण मित्र मंडळ, श्री साई प्रतिष्ठान यांच्यातर्फे **''नेताजी सुभाषचंद्र बोस स्मृती गौरव पुरस्कार''** व हिंदवी स्वराज्य संघटना यांच्यातर्फे ''पु. ल. देशपांडे महाराष्ट्र गौरव पुरस्कार'' प्रदान करण्यात आला.

**प्रा. अनिल आठवले**, यांना हिंदवी स्वराज्य संघटना यांच्यातर्फे **''पु.ल. देशपांडे महाराष्ट्र गौरव पुरस्कार''** प्रदान करण्यात आला.

**श्री. प्रमोद सावंत**, ग्रंथालय विभाग परिचर हे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रम प्रथम श्रेणीत (६१.६%) उत्तीर्ण झाले.

प्रा. प्रकाश माळी लिखित **''तीर्थक्षेत्रांच्या गावा''** हे पुस्तक दि. २२ ऑगस्ट २०१२ रोजी प्रकाशित झाले.

**पालक सभा :**

पालकांना आपल्या पाल्याच्या प्रगतीचा आढावा मिळावा या उद्देशाने सर्व इयत्तेतील विद्यार्थ्यांच्या पालकसभा पतंजली सभागृहात भरवण्यात आल्या होत्या. २३ व २४ ऑगस्ट रोजी F. Y. B. Sc. & S.Y.B.Sc. (Aided विभागांची) पालक सभा घेण्यात आली. २७ आणि २९ ऑगस्ट रोजी F.Y.B.Sc. & S.Y.B.Sc. (Unaided विभागांची) पालक सभा आयोजित करण्यात आली होती. अकरावीच्या विद्यार्थ्यांची पालक सभा २८ ऑगस्ट २०१२ रोजी बाजीराव पेशवे सभागृहात घेण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर व उपप्राचार्य श्री. विनायक दुरकुले सर यांनी पालकांशी संवाद साधला.

**राष्ट्रीय सेवा योजना (NSS)**

**अंधश्रद्धा निर्मूलन** यावर एक दिवसीय कार्यशाळा २० जुले रोजी पतंजली सभागृहात घेण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे **मेडिकल इमर्जन्सी अवेरनेस** यावर दि. २४ जुले रोजी एक कार्यशाळा घेण्यात आली.

Cyber Crime Cell Thane यांच्या मार्गदर्शनाखाली "Cyber Crime Awarness" या विषयावरील कार्यशाळा दि. २८ जुलै ला पतंजली सभागृहात झाली. सुमारे १५० विद्यार्थी व २० शिक्षकांचा यात सहभाग होता.

राष्ट्रीय सेवा योजना मुंबई विद्यापीठ युनिट यांनी पाच दिवसीय Leadership Training Programms(LTC) निवासी शिबीर १० ते १४ ऑगस्ट या कालावधीत आनंद नगर, एम. आय. डी. सी. अंबरनाथ येथे आयोजित केले होते. बांदोडकर महाविद्यालयाच्या ४ विद्यार्थ्यांनी या शिबीरात सहभाग घेतला होता.

सध्याच्या स्पर्धेच्या युगात नुसता पैसा कमवून उपयोगाचे नाही तर तो पैसा योग्य तऱ्हेने योग्य ठिकाणी कसा वापरला पाहिजे याचे ज्ञान विद्यार्थ्यांना होण्याकरिता १७ ऑगस्ट रोजी How to be a Smart Investor? या विषयावर दोन सत्रे आयोजित करण्यात आली होती. प्रा. अनिल चौधरी, जिल्हा संयोजक, NSS Central Line यांनी यावेळी विद्यार्थ्यांना NSS Activities बद्दल मार्गदर्शन केले.

श्री गजानन पाटील, Project Officer, Consumer Guidance Society of India (CGSI) यांनी विद्यार्थ्यांना गुंतवणुकीबद्दल मार्गदर्शन केले.

रक्तदान म्हणजे जीवदान या करता या युनिट तर्फे दि. २२ ऑगस्ट रोजी ब्लडलाईन रक्तपेढी व लायन्स क्लब, कांजुरमार्ग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. यावेळी १११ बाटल्या रक्त जमा झाले.

दि. २९ ऑगस्ट रोजी ब्रेन इंटलिजन्स टेस्ट अवेरनेस या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला.

**Dept of Life Long Learning & Extension**

Dept of Life Long Learning & Extension हा उपक्रम यावर्षापासून बांदोडकर महाविद्यालयात नव्याने सुरू झाला. या उपक्रमाच्या संयोजक पदी डॉ. सौ. विंदा मांजरमकर यांची नियुक्ती झाली आहे. या उपक्रमाची पहिली कार्यशाळा २ ऑगस्ट रोजी पतंजली सभागृहात घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. पात्रेकर, राष्ट्रीय सेवा योजना, SLO यांच्या हस्ते झाले.

**लिटररी असोसिएशन :**

लिटररी असोसिएशन तर्फे ११ ऑगस्ट रोजी कविता व कथा लेखन स्पर्धा घेण्यात आली होती. ही स्पर्धा मराठी, हिंदी व इंग्रजी या तीन्ही भाषांमध्ये घेण्यात आली.

**प्रमाणपत्र अभ्यासक्रम :**

प्राणिशास्त्र विभागातर्फे Preparation of Prawn and Fish Pickle हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम २१ जुलै रोजी पार पडला.

**सांस्कृतिक मंडळ :**

सांस्कृतिक मंडळाचे उद्घाटन १ ऑगस्ट रोजी श्री विनायक दिवेकर, नट व दिग्दर्शक यांच्या हस्ते केले. यावेळी दिवंगत अभिनेता राजेश खन्ना यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित 'जिंदगी का सफर' हा कार्यक्रम करण्यात आला होता.

**Trekking & Hiking :**

महाविद्यालयाच्या Trekking & Hiking समितीतर्फे, पेठ किल्ला, ता. कर्जत येथे एक दिवसीय ट्रेक १९ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला होता. यामध्ये ४९ विद्यार्थी व ११ शिक्षक सहभागी झाले होते.

**सृष्टी क्लब**

वनस्पतिशास्त्र विभागाच्या सृष्टी क्लबचे उद्घाटन दि.२४ ऑगस्ट श्री. एस. एस. बर्वे यांच्या हस्ते झाले. श्री. बर्वे यांचे आजवर ५०० हून अधिक शोधनिबंध, विविध

संशोधनपर निबंध नियतकालिके, मॅगझिन्स व वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. श्री. बर्वे यांनी यावेळी Miracle in Dessert या विषयावर सादरीकरण केले.

**महाविद्यालयातील नवीन उपक्रम**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात BNB e & Bulletin जुलै २०१२ पासून तर BNB e - सप्टेंबर २०१२ पासून हे दोन नवीन उपक्रम सुरू झाले आहेत. या उपक्रमांबद्दल माहिती जाणून घेण्याकरता खालील संकेतस्थळांवर भेट द्यावी.

http :// www.vpmthane.org/ scilebnb.htm
http:// www.vpmthane.org /scile-wallpaper.htm

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे महापालिका विधी महाविद्यालय, ठाणे

**''विधिज्ञ'' चे प्रकाशन :**

महाविद्यालयाचा वार्षिक अंक (२०११-२०१२) ''विधिज्ञ'' चे प्रकाशन ग्योत्रे सांग्येयो विद्यापीठ, जपान चे डॉ. मिचु योनो व मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते दि. ५ सप्टेंबर २०१२ शिक्षक दिनी करण्यात आले. सदर कार्यक्रम हा थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

**शिक्षक दिन साजरा :**

महाविद्यालयामध्ये दि. ५ सप्टेंबर २०१२ रोजी विद्यार्थी मंडळाच्या माध्यमातून शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी त्यांचे विचार व्यक्त केले.

**जपानी विद्यार्थ्यांची भेट :**

दि. ६ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ४ ते ५ या दरम्यान डॉ. मिचु थानो व जपानी विद्यार्थ्यांनी विधी महाविद्यालयाला सदिच्छा भेट दिली. डॉ. थानो व सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत केल्यानंतर त्यांच्यासाठी चहापानाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. सर्व पाहुण्यांना मुट कोर्ट हॉल मध्ये बसवून प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार यांनी 'भारतीय कायदा व्यवस्था' या विषयावर PPP सादर केले. काही विद्यार्थ्यांनी भजन व शास्त्रीय गायन केले. त्यांचा स्वागतासाठी रांगोळी काढण्यात आली होती.

महाविद्यालयामध्ये दि. २९ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांसाठी मुट कोर्ट हॉल मध्ये मुट कोर्ट चे सादरीकरण करण्यात आले. तृतीय विधी वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सदर सादरीकरण केले. सदर कार्यक्रमासाठी प्रो. पराजपे व ॲड विद्या गायकवाड यांनी न्यायधीश म्हणून काम पाहिले. खालील विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला.

१) कु. रूपाली अकोलकर
२) जयेश गोखले
३) भरत पारवानी
४) कु. हर्षदा काळसकर

केस नं. १. - ग्राहक संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत सदर केस दिल्ली राज्य ग्राहक मंडळ यांच्याकडे सादर करावयाची होती. सदर केस मध्ये Airport अधिकाऱ्याच्या दुर्लक्षतेमुळे झालेल्या मृत्यूची नुकसान भरपाई मागणी ही होती.

केस नं. २ - एक ३ वर्षाची मुलगी टि. व्ही मालिकेच्या शूटिंग दरम्यान जखमी झाल्यामुळे मुंबई उच्च न्यायलय (OS) याच्या करार कायदा व नुकसानीचा कायदा खाली भरपाई मागणे असा होता.

सदर सादरीकरण बघण्यासाठी पूर्ण सभागृह विद्यार्थ्यांनी भरले होते. यावेळी प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी आभार मानले.

प्रगती महाविद्यालय डोंबिवली यांनी दिनांक २२ ऑगस्ट २०१२, बुधवार रोजी API गरज प्रक्रिया आणि

अंमलबजावणी या विषयावर एका कार्यशाळेचे आयोजन केले होते. सदर कार्यशाळेमध्ये ६ व्या वेतन आयोगानुसार पदोन्नती चे निकष यावर चर्चा करण्यात आली. प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार आणि प्रा. मिथुन बनसोडे यानी सदर कार्यशाळेमध्ये भाग घेतला.

प्रथमवर्ष विधी – वादविवाद स्पर्धा

प्रथम वर्ष विधी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वादविवाद स्पर्धेचे आयोजन दिनांक १६ ऑगस्ट रोजी करण्यात आले. सदर स्पर्धेमध्ये एकूण १७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे ठेवण्यात आले होते.

१) लोकपाल बिलाच्या प्रस्तावित कायद्यासाठी आमरण उपोषण योग्य की अयोग्य?

२) मद्यपान करण्यासाठी वयाची मर्यादा कायद्याने निश्चित करणे हे मूलभूत अधिकाराच्या विरुद्ध आहे की नाही?

३) चित्रपटांचे पोस्टर रस्त्यावरती आणि सार्वजनिक वहानांवरती लावण्याच्या विरोधातील तक्रारी महानगरपालिकेने घ्याव्यात की नाही?

४) महाराष्ट्रामध्ये गुटखाबंदी योग्य कि अयोग्य?

या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांपैकी –

१) प्रथम पारितोषिक : १) रंजनी कृष्णन्
२) स्वाती बाळ टेंबे

२) द्वितीय पारितोषिक : विकाश कुमार

३) तृतीय पारितोषिक : १) देवकी नंदन सिंग
२) मोहिनी सावला

तसेच उत्तेजनार्थ बक्षिसे : १) हर्षवर्धन खांबेटे
२) उज्ज्वला आरोटे
३) विकास आंबेटकर

या विद्यार्थ्यांना देण्यात आली. सदर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सौ. श्रीविद्या जयाकुमार आणि सौ. रंजन जोशी यांनी काम पाहिले. त्याचबरोबर सौ. दिक्षिता गुप्ते यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामध्ये ही स्पर्धा पार पडली.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

अतिथी व्याख्यानमाला –जुलै २०१२

१. विषय : किरकोळ व्यापार सद्यस्थिती (Current Scenario of the Retail Sector)

किरकोळ व्यापार या क्षेत्रातील सल्लागार श्री. सुगम चौबळ यांनी किरकोळ व्यापार उद्योग या विषयावर बोलताना असे सांगितले की मूलतः किरकोळ व्यापार उद्योग हा आपल्याकडे असंगठित होता. जागतिकीकरणानंतर जेव्हा या उद्योगामध्ये प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीस (FDI) परवानगी मिळाली तेव्हा आजकाल हे क्षेत्र संगठित स्वरूपात उदयास येत आहे. खरेतर पूर्वीही किराणा मालाची दुकाने, सहकार बाजार, सरकारी दुकाने इत्यादी स्वरूपात हा किरकोळ व्यापार उद्योग अस्तित्वात होता. परंतु नव्या स्वरूपातील भारतीय किरकोळ व्यापार उद्योग हा विदेशी गुंतवणूक आणि १००% मालकी तत्वास परवानगी मिळाल्यानंतर उदयास आले व विस्तारत गेले. IKEA या कंपनीने तर भारतात या क्षेत्रात १.९ अब्ज डॉलर इतक्या गुंतवणुकीचा आणि २५ दुकाने थाटण्याचा इरादा व्यक्त केला आहे. तर Wallmart Stores Inc. आणि सुनील मित्तल यांची Bharati Enterprises या कंपन्यांनी येत्या ७ वर्षात संयुक्तपणे १०-१५ Cash & Carry सुविधा केंद्रे सुरु करण्याच्या योजना केल्या आहेत. तसेच इतरही अनेक कंपन्या या क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी पुढे येत आहेत. The Wall Street Journal या प्रसिद्ध वर्तमानपत्रातील एका लेखामध्ये तर भारतातील

या क्षेत्रात होणाऱ्या गुंतवणुकीमुळे सुमारे १ करोड रोजगाराच्या संधी निर्माण होणार असल्याचा दावा केला आहे.

असे असले तरीही भारतामध्ये किरकोळ व्यापार उद्योग क्षेत्राच्या विकासाला काही कारणांमुळे मर्यादा पडतात. जसे या क्षेत्रातील ज्ञान / कौशल्याची कमतरता, कर आकारणीचे काही जाचक नियम, स्थानिक कायदे इत्यादी. तसेच या क्षेत्राच्या विस्तारावर विदेशी कंपन्यांची बाजारातील मक्तेदारी, स्थानिक कंपनी brand वर होणारा अन्याय आणि त्यामुळे येणारी बेरोजगारी अशा शक्यता व्यक्त होऊन जोरदार टीकादेखील होत आहे.

यामुळेच सद्यस्थितीत या उद्योग क्षेत्राला उद्योग स्थापण्यासाठी स्थान निश्चिती, किंमत निश्चिती, अपेक्षित ग्राहक वर्ग, उद्योगाच्या प्रचालनाचा विस्तार इत्यादी आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

२. विषय : Lean Management एक व्यावसायिक व्यूहरचना

श्री. श्याम तळवडेकर यांनी आपल्या व्याख्यानात उत्पादन क्षेत्रातील "kaizen, Continuous Quality Improvement (CQI) या संकल्पना Lean Management च्या संदर्भात विशद केल्या. त्यांच्या मते मनुष्य बळ आणि वेळ यांना संपत्तीप्रमाणे मूल्य दिले पाहिजे. kaizen संकल्पनेमध्ये ग्राहकाला दिलेल्या कोणत्याही आश्वासनाबाबत कमालीचे गांभीर्य असणे महत्वाचे असते. kaizen कार्य संस्कृती / कार्य पद्धतीबद्दल अधिक माहिती देताना ''फ्लीट गार्ड फर्टीलायझर'', पुणे येथे श्री. तळवडेकर यांनी नव्याने प्रस्थापित केलेल्या २-२-२-२ (c) या कार्यपद्धतीबद्दल विस्ताराने माहिती दिली. या पद्धतीमध्ये संघ नायकाने उत्पादन कार्यात स्वतः योगदान देऊन सहकारी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक असते असे सांगितले. त्यानंतर त्यांनी P-D-C-A चक्र TPM TQC पूर्ण दर्जा नियंत्रण, Just In Time इत्यादी संकल्पनांबद्दल देखील चर्चा केली. श्री. तळवडेकर यांच्या मते उद्योग संस्थांनी किंवा व्यवस्थापनातील उच्च स्तरीय संचालकांनी ७ स्तरांचे P-D-C-A (c) चक्र; २-२-२-२ (C) या कार्यपद्धतीसह स्वीकारल्यास त्याचा उपयोग केवळ उत्पादन क्षेत्रातील समस्या सोडवण्यापुरता मर्यादित न राहता प्रकल्प व्यवस्थापन / सुधारणा आणि व्यावसायिक निर्णय यासाठी देखील होऊ शकतो. फक्त या प्रणालीची अंमलबजावणी जबाबदारीने केली गेली पाहिजे असे सांगितले.

अतिथी व्याख्यानमाला -जुलै २०१२

विषय : Perspective Management

डॉक्टर अनिल नाईक यांनी व्यवस्थापन या विषयीचे विविध दृष्टिकोन विषद करताना आपल्या व्याख्यानाची सुरुवात नवीन उद्योजकांसमोरील आव्हाने आणि टप्पे यासंबधी आपले विचार व्यक्त करुन केली. त्यांच्या मते व्यवस्थापन म्हणजे संस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी त्या संस्थेतील व्यक्तींना एकत्रितपणे प्रभावीपणे कार्यक्षमतेने पार पडण्याची संघिक कृती आहे. व्यवसाय व्यवस्थापन या क्षेत्रातील ध्येय, दृष्टिकोन, उद्दिष्टे, स्पर्धा, निर्णयक्षमता, नेतृत्व गुण, या महत्वाच्या मुद्यांबरोबरच व्यवसायामध्ये उद्योजकाने नेहमी आपले वेगळेपण जपले पाहिजे हे देखील तितकेच महत्वाचे आहे असे त्यांनी सांगितले. व्यवसाय मध्ये सातत्याने नवनवीन गोष्टी शिकल्या पाहिजेत आणि काळानुरुप आपल्या कक्षा नव्याने आखल्या पाहिजेत. यावर डॉक्टर नाईक यांनी भर दिला.

भारतीय उद्योगव्यवस्थेची सद्यस्थिती, ग्राहकाचे समाधान, उत्पादन / सेवांचा उच्च दर्जा, ग्राहकाच्या गरजेनुसार तयार केली जाणारी उत्पादने, इत्यादी

विषयावरही डॉक्टर नाईक यांनी चर्चा केली. तसेच वैचारिक कौशल्य (Thinking Skills), सृजनशील व्यक्ति मत्व Creative Personalities, Six Thinking Hats, Business Risk, Scenario Building या संकल्पनां बद्दलही थोडक्यात माहिती दिली. या बरोबरच कौटिल्याने सांगितलेली व्यावास्थापनाची सूत्रे, जे. आर. डी. टाटा यांचे परिपूर्ण यशस्वी उद्योजकाचे व्यक्तिमत्व इत्यादी अनेक व्यक्ती आणि संकल्पनांबद्दल डॉक्टर नाईक यांनी अनेक उदाहरणे आणि प्रसंग सांगून प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

विषय : Brand Management-Emerging International Trends "Strategic Branding"

डॉ. अविनंदन मुखर्जी यांनी आपल्या व्याख्यानाच्या सुरुवातीला Branding ही संकल्पना श्रोत्यांना अनेक प्रश्न विचारून Interactive Session पद्धतीने समजावून सांगितली. Branding मध्ये Brand चे घोषवाक्य कसे महत्वाचे असते, एखादा Brand हा स्वत:चे वेगळेपण कसे व्यक्त करतो. Social Media Marketing (FaceBook, twitter) इत्यादीए तसेच CSR (Corporate Social Responsibility) Brand प्रसिद्ध होण्यासाठी कसे मदत करू शकतात याबद्दल डॉ. अविनंदन मुखर्जी यांनी माहिती दिली. तसचे भारतीय बाजारपेठेची वैशिष्ठे वेगळे पण, Brand performance, Brand strategy, External Branding, Internal branding, interactive branding इत्यादी अनेक संकल्पना त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या. विविध brands बद्दल अनेक उदाहरणे आणि माहिती देऊन प्रश्नोत्तर पद्धतीने त्यांनी branding विषयाशी संबंधित अनेक मुद्द्यांवर चर्चा केली.

●●●

## भूमिपात

विश्वात होणारी काही नैसर्गिक संकटे, मग ती पृथ्वीच्या कक्षेतील असोत किंवा कक्षेबाहेरील. त्याचे परिणाम जेव्हा पृथ्वीवरील प्राणी मात्रांवर होतात तेव्हा हा पर्यावरणाशी निगडित असलेला भाग अवश्य विचार करायला लावतो. हिमालयापासून बऱ्याच अंतरावर राहाणाऱ्या आपल्या सारख्यांना हिमालयाचे डोंगर दुरून साजरेच दिसतात. लोभस वाटतात. पण हिमालयात सतत टांगणीला असलेलं एक नैसर्गिक भयावह संकट म्हणजे भूमिपाताचं (लॅंडस्लाईड). हिमालयातील बृहद हिमालय, मध्य हिमालय ते शिवालिक हिमालय या टेकड्यांच्या मध्यवर्ती भूमीत या भूमिपातांच्या संकटाचं भय सतत असतं. ह्या भूमिपाताची क्रिया ही एकदा झाल्यावर बराच काळपर्यंत सुरू असते. त्यामुळे मनुष्य वस्तीच्या भागात असे भूमिपात झाल्यास ते फारच विध्वंसक ठरतात. मराठीतील प्रभाकर पेंढारकर यांची रारंगढांग ही कादंबरी सैन्याला भूमिपातांचा कसा सामना करावा लागतो या विषयावर आहे.

●●●

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टके असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टके संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवींसाठी आवाहन:**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणगी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षांचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवींच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

•••


(कव्हर २ वरून - संपादकीय)

प्रकट करत नाहीस. म्हणजे शेवटी यंत्रापेक्षा त्यामागील माणूस जास्त महत्वाचा असतो आणि म्हणूनच बदल हवा किंवा संस्कार हवेत ते यंत्रामागील माणसावर अनियंत्रितता मग ती स्वातंत्र्याची असो की विचारांची असो ही नेहमीच चिंतेची बाब आहे. जुन्या पेशींचा नाश होतो तेव्हा नवीन पेशींची निर्मिती होते. तशी क्षमता त्या पेशीमध्ये असते, पण ही वाढ जेव्हा अनियंत्रित असते तेव्हा तिचे रुपांतर कर्करोगात होते, की जे माणसाला संपवते. माणसात अगणित क्षमता असतात. संस्कृती त्याला नियंत्रित करुन सामाजिक संतुलनाच्या स्तरावर आणून ठेवते. हे संतुलन समाजात, संस्कृतीत आणण्याचे कार्य हे सामाजिक वा सांस्कृतिक नेतृत्व करीत असते. मुलांच्या बाबतीत म्हणाल, तर हे नेतृत्व निसर्गत: त्यांच्या पालकांकडे, शालेय शिक्षकांकडे जाते. संस्कारक्षम वया मध्येच अशी विवेक क्षमता रुजवावी लागते. आजचा भ्रष्टाचार, सर्वच राजकीय पक्षांची दिवाळखोरी हा या दिवाळखोर नेतृत्वाचाच परिणाम असतो. आजच्या आपल्या समाजाचे विकृतीकरण हे त्याचेच प्रतिबिंब आहे. तेव्हा यंत्रांमधील बदल वा त्याच्या क्षमतांवरील नियंत्रण हे उपाय हास्यास्पद असून बदलाची गरज आहे ती माणसामध्ये. अशा संस्कारित माणसाची यंत्रे व त्यांचा वापरही संस्कारित होतो.


- डॉ. विजय बेडेकर

संपादक, व्ही.पी.एम. दिशा

●●●



## विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा,
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावंस ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी,
माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर